मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

वर्ष : ३ | अंक : २७४ | बुधवार, १७ जून २०२६ | किंमत : २ रु | पृष्ठ : ८ | RNI MAHMAR/2023/89514

# सर्व गट बरखास्त करुन एकच रिपब्लिकन पक्ष उभा करा - केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले

## घाटकोपरमधील शिवसेना (उबाठा) कार्यकर्त्यांचा रिपब्लिकन पक्षात प्रवेश

**दैनिक युवक आधार**

**मुकुंद कांबळे सहसंपादक मुंबई :** महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी संकल्पित केलेला रिपब्लिकन पक्ष 3 ऑक्टोबर 1957 रोजी स्थापन झाला. त्या नंतर च्या काळात रिपब्लिकन पक्षाचे अनेक गट झाल्याने समाजाचे आणि रिपब्लिकन पक्षाचे मोठे नुकसान झालेले आहे.समाजातील विविध रिपब्लिकन गट बरखास्त करून एकच रिपब्लिकन पक्ष उभा केला पाहिजे. जे लोक स्वतःला आंबेडकरवादी मानतात मात्र ते इतर राजकीय पक्षात काम करतात त्यांनी रिपब्लिकन पक्षात आले पाहिजे असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. घाटकोपर पश्चिम येथील कच्छी कडवा पाटीदार वाडी सभागृहात आयोजित केलेल्या सत्कार समारंभात ना रामदास आठवले बोलत होते.राज्यसभेत सलग तिसऱ्यांदा निवड झाल्याबद्दल केंद्रिय राज्यमंत्री ना.रामदास आठवले



यांची निवड झाल्याबद्दल घाटकोपर मधील रिपब्लिकन पक्षाच्या वतीने आयोजित केलेल्या सत्कार सोहळ्यात ना. रामदास आठवले बोलत होते.यावेळी शिवसेने चे माजी विधानसभा संपर्क प्रमुख ज्येष्ठ शिवसैनिक मोहन वाघमारे यांच्या नेतृत्वात शिवसेना उबाठा च्या कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षात यावेळी जाहीर प्रवेश केला.

केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे नेतृत्व दलित सवर्णांना जोडणारे असून सर्व समाजातील गरीब, गरजुंना अडीअडचणीत अडकलेल्यांना न्याय देणारे नेतृत्व आहे. देशभरातील दलित बहुजनांचा आवाज बुलंद करणारे नेतृत्व असल्यामुळेच आपण रिपब्लिकन पक्षात प्रवेश केल्याचे शिवसेना उबाठा मधील ज्येष्ठ शिवसैनिक मोहन वाघमारे यांनी



आपले मनोगत व्यक्त केले.

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना वहया वाटप

यावेळी वरद विनायक समर्थ बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या वतीने केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते गरीब गरजु विद्यार्थ्यांना मोफत वहया वाटप करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक रिपब्लिकन पक्षाचे प्रसिध्दी प्रमुख हेमंत रणपिसे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुंबई प्रदेश कार्याध्यक्ष बाळासाहेब गरुड होते. यावेळी शिवसेना उबाठातील मोहन वाघमारे यांनी त्यांच्या अनेक शिवसैनिक कार्यकर्त्यांनी रिपब्लिकन पक्षात प्रवेश केला. यावेळी रिपब्लिकन पक्षाचे महाराष्ट्र राज्य सरचिटणीस गौतम सोनवणे, राष्ट्रीय उपाध्यक्ष काकासाहेब खंबाळकर, ॲड.बी.के. बर्वे, एम एस नंदा; जिल्हाध्यक्ष अजित रणदिवे, सोहेल शेख; प्रकाश जाधव; आत्माराम वाघमारे; डॉ.निलेश बनसोडे;

अनिल जाधव ;राजेश सरकार ;संदेश हाटे, मुंबई प्रदेश उपाध्यक्ष महिला आघाडी नैनाताई वैराट, वरद विनायक समर्थ बहुउद्देशीय सेवा संस्थेच्या अध्यक्षा श्रुती मनिष पाटील, विजय सुंदर शेट्टी, डॉ. समविद भट, ॲड. स्मिता चिपळुणकर, सुप्रसिध्द निवेदिका स्वाती रत्नपारखी, अमीना खान; शरफू खान; देवेंद्र रणपिसे, मनोज रणपिसे, सुधीर निकम; गजानन तायडे; चंद्रकांत निकम ; आरिफ तांबोळी, अली चौधरी, सुनील गवई, सुशांत बोडके, आदि अनेक मान्यंवर उपस्थित होते.

---



**पाटोदा नगर पंचायतचे सभापती रामेश्वर गोरे यांचा वाढदिवसा निमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना. लोकनेते आमदार सुरेश आण्णा धस यांचे स्विय सहाय्यक तथा पाटोदा तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष सोमिनाथ कोल्हे, माजी उपनगराध्यक्ष तथा नगरसेवक पठाण नय्युम भाई, माजी सभापती तथा नगरसेवक श्रीहरी गिते पाटील, विशाल आरसुळ, नाभिक संघटनेचे जितेंद्र सांगळे, नगर पंचायत कर्मचारी आडागळे सह इतर**

**(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)**

# कळंबोलीत भरधाव कारचा थरार; पादचाऱ्यांना चिरडत क्लिनिकला धडक, अनेक जखमी


**दैनिक युवक**

**पनवेल प्रतिनिधी :** कळंबोली परिसरात सोमवारी संध्याकाळी सातच्या सुमारास भरधाव कारमुळे मोठी दुर्घटना घडली. कळंबोली सेक्टर-१ मधील मार्केट परिसरात एका भरधाव कारने रस्त्यालगत असलेल्या पादचाऱ्यांना धडक देत थेट डेंटल क्लिनिकला धडक दिली. या घटनेत महिला, पुरुष तसेच दोन लहान मुलांसह अनेक जण जखमी झाले असून अनेक



दुचाकींचेही मोठे नुकसान झाले आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, भरधाव वेगात आलेल्या कारने सुरुवातीला रस्त्यावरील नागरिकांना धडक दिली आणि त्यानंतर नियंत्रण सुटल्याने ती थेट क्लिनिकमध्ये घुसली. अपघातात जखमी झालेल्या दोन लहान मुलांची प्रकृती गंभीर असल्याचे सांगण्यात येत आहे. घटनेनंतर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने घटनास्थळी जमले होते. संतप्त जमावाने कारचालकाला मारहाण करण्याचा प्रयत्न केल्याची माहिती समोर येत आहे. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत कारचालकाला आपल्या ताब्यात घेतले आणि थेट पोलीस ठाण्यात हलवले. सदर कार चालक हा कळंबोलीतील सत्यम या खाजगी रुग्णालयाशी संबंधित डॉक्टर असून त्यांचे नाव डॉ. संजय बरनवाल असल्याचे सांगितले जात आहे. त्यांना कळंबोली पोलिसांनी ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. घटनास्थळी उपस्थित काही नागरिकांनी कारचालक मद्यधुंद अवस्थेत असल्याचा आरोप केला आहे. मात्र, याबाबत अधिकृत दुजोरा मिळालेला नसून वैद्यकीय तपासणी आणि मेडिकल रिपोर्ट आल्यानंतरच चालक मद्यधुंद होता की नाही, हे स्पष्ट होणार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे. अपघातातील सर्व जखमींना तातडीने कामोठे येथील एमजीएम रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. दरम्यान, या संपूर्ण घटनेचा थरारक सीसीटीव्ही फुटेज समोर आला असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. नागरिकांनी संबंधितांवर कठोर कारवाई करण्यासह जखमींना नुकसानभरपाई देण्याची मागणी केली आहे.

---




# रुग्णसेवा की चित्रीकरण? रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात नेमके प्राधान्य कुणाला!

## सरकारी दवाखान्यात चित्रपटाचे सेट, रुग्ण मात्र प्रतीक्षेत; नागरिकांचा संताप

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे रेवदंडा :** सर्वसामान्य नागरिकांना मोफत व दर्जेदार आरोग्यसेवा देण्यासाठी उभारण्यात आलेल्या रेवदंडा प्राथमिक आरोग्य केंद्रात सध्या सुरू असलेल्या चित्रपट अथवा मालिकेच्या चित्रीकरणामुळे रुग्णसेवा बाधित झाल्याचा गंभीर आरोप स्थानिक नागरिक आणि रुग्णांकडून करण्यात आला आहे. सरकारी आरोग्य संस्थेचे रूपांतर काही काळासाठी चित्रीकरणाच्या सेटमध्ये झाल्याचे चित्र पाहायला मिळाल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.मिळालेल्या माहितीनुसार, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या परिसरात मोठ्या प्रमाणावर कलाकार, तांत्रिक कर्मचारी, चित्रीकरणासाठी लागणारे साहित्य, वाहने आणि अन्य यंत्रसामग्री आणण्यात आली होती. परिणामी संपूर्ण परिसरात गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. उपचारासाठी आलेल्या अनेक रुग्णांना तपासणीसाठी प्रतीक्षा करावी लागल्याचा आरोप करण्यात आला असून काहींना रुग्णालयात प्रवेश करतानाही अडचणींचा सामना करावा लागल्याचे सांगण्यात येत आहे.विशेषतः



वृद्ध नागरिक, महिला, लहान मुले आणि गंभीर स्वरूपाच्या तक्रारी घेऊन आलेल्या रुग्णांना या परिस्थितीचा सर्वाधिक फटका बसल्याचे बोलले जात आहे. आरोग्य केंद्रात उपचारासाठी आलेल्या नागरिकांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त करत, "सरकारी दवाखाना हा रुग्णांसाठी आहे की चित्रपट निर्मात्यांसाठी?" असा थेट सवाल उपस्थित केला आहे.स्थानिकांच्या मते, सरकारी मालमत्तेचा वापर चित्रीकरणासाठी करण्यात येत असेल तर त्यासाठी कोणती परवानगी देण्यात आली? कोणत्या अटी व शर्ती घालण्यात आल्या? रुग्णसेवा बाधित होणार नाही याची खात्री कोणी केली? आणि जर प्रत्यक्षात रुग्णांना त्रास झाला असेल तर त्याची जबाबदारी कोण घेणार? असे अनेक प्रश्न आता उपस्थित होत आहेत.दरम्यान, या प्रकरणी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. प्राची नेहुलकर यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, प्राथमिक आरोग्य केंद्राचे नियमित कामकाज पूर्ण झाल्यानंतर सायंकाळच्या वेळेतच चित्रीकरणास परवानगी देण्यात आली होती. ओपीडी अथवा रुग्णसेवा सुरू असताना कोणत्याही प्रकारे अडथळा निर्माण होऊ नये, अशा स्पष्ट सूचना संबंधितांना देण्यात आल्या होत्या."जर प्रत्यक्षात ओपीडी सुरू असताना चित्रीकरणामुळे रुग्णांच्या तपासणी किंवा उपचार प्रक्रियेत अडथळे निर्माण झाले असतील, तर ते अत्यंत गंभीर आहे. या संपूर्ण प्रकरणाची तातडीने चौकशी करण्यात येईल. दोषी आढळल्यास संबंधितांना चित्रीकरण त्वरित थांबविण्याच्या सूचना देण्यात येतील," असे डॉ. नेहुलकर यांनी स्पष्ट केले.मात्र नागरिकांच्या मते, चौकशीची घोषणा पुरेशी नसून जबाबदार अधिकाऱ्यांवर कारवाई होणे गरजेचे आहे. कारण ग्रामीण भागातील नागरिकांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्र हीच आरोग्यसेवेची पहिली आणि अनेकदा एकमेव आशा असते. अशा ठिकाणी रुग्णसेवेपेक्षा व्यावसायिक चित्रीकरणाला प्राधान्य दिले जात असल्याचा संदेश गेल्यास तो अत्यंत धोकादायक ठरेल.सरकारी रुग्णालयांमध्ये चित्रीकरणाला परवानगी देताना रुग्णांच्या गोपनीयतेचे, सुरक्षिततेचे आणि उपचार प्रक्रियेचे संरक्षण करण्यासाठी नेमकी कोणती यंत्रणा कार्यरत आहे, याबाबतही आता प्रश्न उपस्थित होत आहेत. रेवदंड्यातील या घटनेमुळे आरोग्य विभागाच्या कार्यपद्धतीवर चर्चा सुरू झाली असून जिल्हा प्रशासन या प्रकरणात कोणती ठोस भूमिका घेते आणि जबाबदारांवर काय कारवाई करते याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# गोंदिया जिल्हा काँग्रेसचे नवनियुक्त अध्यक्ष अमर वराडे यांचा आमगाव तालुका दौरा; कार्यकर्त्यांशी संवाद साधून संघटन बळकटीकरणावर भर

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा प्रतिनिधी** : गोंदिया जिल्हा काँग्रेस कमिटीचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी आपला पदभार स्वीकारल्यानंतर, जनतेशी थेट संवाद साधण्यासाठी आणि पक्ष संघटना अधिक बळकट करण्यासाठी आमगाव तालुक्यात जनसंपर्क व कार्यकर्ता भेट दौरा आयोजित केला. या दौऱ्याच्या माध्यमातून त्यांनी तालुक्यातील विविध गावांना भेटी देऊन पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या.

**गावागावात जाऊन साधला जनसंपर्क**

या दौऱ्यात जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांनी ठाणा, जांभूळटोला, अंजोरा, बोरकन्हार, आमगाव नगर परिषद क्षेत्र, शंभूटोला, कट्टीपार, घाटटेमनी, करंजी, कातुर्ली आणि सितेपार या गावांचा दौरा केला. प्रत्येक ठिकाणी त्यांनी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी चर्चा करून पक्ष संघटनेच्या विस्ताराचा आढावा घेतला.

आमगाव नगर परिषद क्षेत्रात खासदार नामदेवराव किरसान



यांच्या जनसंपर्क कार्यालयात कार्यकर्त्यांची विशेष बैठक पार पडली. या बैठकीत आगामी राजकीय घडामोडी, संघटनात्मक कार्यक्रम आणि जनतेच्या ज्वलंत प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

**डरो मत'चा संदेश आणि काँग्रेसची ध्येयधोरणे**

यावेळी बोलताना जिल्हाध्यक्ष अमर वराडे म्हणाले की, "जिल्हाध्यक्ष म्हणून माझी जबाबदारी आहे की मी लोकांपर्यंत आणि त्यांच्या समस्यांपर्यंत पोहोचले पाहिजे. काँग्रेस कार्यकर्त्यांनी कोणाच्याही दबावाला बळी न पडता, राहुल गांधींचा 'डरो मत' हा संदेश घेऊन आत्मविश्वासाने काम करावे. जनतेमध्ये आत्मविश्वास निर्माण करणे आणि काँग्रेसची विचारधारा तळागाळापर्यंत पोहोचवणे हेच आमचे ध्येय आहे".

**उपस्थितांची उपस्थिती**

या दौऱ्याच्या निमित्ताने काँग्रेस पदाधिकाऱ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. यावेळी जिल्हाध्यक्ष अमर वराडे यांच्यासह प्रदेश सचिव पी. जी. कटरे, तालुकाध्यक्ष संजय बहेकार, खासदार प्रतिनिधी दुष्यंत किरसान, जिल्हा परिषद सदस्य छबूताई उके, महिला जिल्हा उपाध्यक्ष प्रभादेवी उपराडे, शहराध्यक्ष देवकांत बहेकार, परिवहन सेलचे जिल्हा अध्यक्ष बाबा मिश्रा, दिलीप टेंभरे, यादोराव भोयर, रामेश्वर श्यामकुवर, जगदीश चुटे, भोला गुप्ता, राधाकिसन चुटे, पिंकेश शेंडे, राधेलाल रहांगडाले, राहुल चुटे, तपीस परिहार, समीर खान यांच्यासह मोठ्या संख्येने काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन भोला गुप्ता यांनी केले, तर आभार प्रदर्शन शहराध्यक्ष देवकांत बहेकार यांनी केले.

अमर वराडे यांच्या या दौऱ्यामुळे आणि त्यांच्या थेट संवादामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवीन ऊर्जेचे संचार झाले असून, आगामी काळात काँग्रेस पक्ष अधिक ताकदीने जनतेच्या प्रश्नांसाठी उभा राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# कोरंबभीत बिबट्याच्या हल्ल्यात 11 शेळ्या ठार

## नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

**संजीव भांबोरे भंडारा -** पवनी तालुक्यातील कोरंभी गावात दिनांक 15 जून 2026 ला जवळपास रात्री १२ वाजेच्या दरम्यान एक बिबट्या गावात शिरला व एका गोठ्यात बांधलेल्या शेळ्यावर हल्ला केला.

यात पशुपालक गुरुदास सुदामे यांच्या मालकीच्या 11 शेळ्या ठार झाल्या आणि इतर तीन गंभीर जखमी झाल्या . बिबट्या हा रात्रीच्या सुमारास सुदामे यांच्या घराशेजारी गोठ्यात शिरला आणि त्याने शेळ्यावर हल्ला केला. वन परिषद अधिकारी तृषाली नागदेवे आणि क्षेत्र सहाय्यक सौंदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली बीड गाईड डिव्हिजन मेश्राम राजाराम राठोड रॅपिड ॲक्शन टीमचे सदस्य घटनास्थळी दाखल झाले.




पंचनामा केला बाधित शेतकऱ्याला नुकसान भरपाई पशुपालन शेतकऱ्याला आर्थिक मोबदला देण्यात यावा अशी मागणी कोरंबी येथील उपसरपंच चंदू भाऊ कावळे यांनी केली आहे. कोरंबी आणि आसपासच्या परिसरातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. लवकरात लवकर बिबट्याला तात्काळ पकडण्याची मागणी कोरंबी येथील उपसरपंच चंदूजी कावळे यांनी केली आहे.

# रेवस-करंजा पूल काम: 'एफकॉन्स' कंपनीच्या निष्काळजीपणामुळे स्थानिक मच्छीमारांचे किमान एक लाखाचे नुकसान; भरपाईची मागणी!

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी** : रेवस ते करंजा पुलाचे काम करणाऱ्या 'एफकॉन्स इंडिया प्रायव्हेट लिमिटेड'कंपनीच्या समुद्रातील कामामुळे स्थानिक मच्छीमारांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. कंपनीच्या समुद्रातील एका बोयामुळे करंजा कोंढरी पाडा येथील बोट मालक भारत पाटील यांच्या जाळ्यांचे आणि खांबांचे किमान एक लाख रुपयांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामुळे आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या मच्छीमारांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

**खांब आणि महागडी जाळी उद्ध्वस्त;**

सध्या समुद्रात रेवस-करंजा पुलाचे बांधकाम वेगाने सुरू आहे. हे काम करत असताना कंपनीकडून योग्य ती काळजी घेतली जात नसल्याचा आरोप स्थानिक मच्छीमारांनी केला आहे. समुद्रात सुरक्षेसाठी किंवा कामासाठी सोडण्यात आलेल्या कंपनीच्या बोयामुळे मच्छीमार भारत पाटील यांच्या जाळ्यांचे प्रचंड नुकसान झाले आहे. मच्छीमारांनी अत्यंत मेहनतीने समुद्रात उभारलेले खांब देखील कंपनीच्या या कामामुळे उद्ध्वस्त झाले आहेत. या संपूर्ण दुर्घटनेत भारत पाटील यांचे किमान १ लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे.

**पावसाळी बंदीत उपासमारीचे संकट;**

सध्या समुद्रात अधिकृत पावसाळी मासेमारी बंदीचा काळ सुरू आहे. या काळात आधीच छोट्या मच्छीमारांवर उपासमारीचे संकट ओढवले आहे. घरात कोणताही आर्थिक स्त्रोत नसताना, अशा



कठीण परिस्थितीत लाखो रुपयांच्या महागड्या जाळ्यांचे आणि साधनांचे नुकसान झाल्यामुळे भारत पाटील यांच्यासह स्थानिक मच्छीमार पूर्णपणे हतबल झाले आहेत.

**मच्छीमारांची मागणी:**

त्वरित नुकसान भरपाई: एफकॉन्स कंपनीच्या निष्काळजीपणामुळे झालेल्या किमान एक लाख रुपयांच्या नुकसानीची दखल घेऊन बाधित मच्छीमार भारत पाटील यांना त्वरित योग्य ते आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी. कंपनी प्रशासनाने समुद्रात काम करताना घ्यावी जेणेकरून भविष्यात स्थानिक मच्छीमारांच्या साधनांचे पुन्हा नुकसान होणार नाही .जर कंपनीने यावर तातडीने तोडगा काढला नाही तर हक्काच्या रोजगारासाठी आणि झालेल्या अन्यायविरोधात मच्छीमार आक्रमक पवित्रा घेण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# भांडुपच्या सह्याद्री विद्यामंदिरात प्रवेशोत्सवाचा सोहळा; चिमुकल्यांचे औक्षण करून स्वागत

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (दत्ता खंदारे / प्रतिनिधी)** :सह्याद्री विद्यामंदिर भांडुप बालनिकेतन व प्राथमिक विभागाचा शालेय प्रवेशोत्सव सोहळा सोमवार दि.१५ जून २०२६रोजी दुपारच्या सत्रात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेचा पहिला दिवस विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील आनंददायी आठवण व्हावा या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

संपूर्ण शालेय परिसर रंगीबेरंगी फुगे, आकर्षक रांगोळी आणि उत्सवी सजावटीने



सजविण्यात आला होता. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत पारंपरिक पद्धतीने औक्षण करून करण्यात आले. इयत्ता पहिलीतील चिमुकल्यांच्या पावलांचे ठसेही घेण्यात आले. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील आनंद, आकर्षक गणवेश, हातातील रंगीत फुगे आणि डोक्यावरील स्वागत टोपी यामुळे वातावरण अधिकच आनंददायी झाले होते.

या कार्यक्रमास संस्थेचे उपाध्यक्ष मा. जगन्नाथजी अंबरे साहेब, सचिव मा. रमेशजी राणे साहेब, उपसचिव मा. रविंद्र राणे साहेब, संस्था सदस्य मा. अरुण राणे व मा. सुनील पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. शाळेच्या मुख्याध्यापिका मा. गीतांजली पाटील मॅडम, ज्येष्ठ शिक्षिका मा. मिनल सागवेकर मॅडम यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

औक्षणानंतर विद्यार्थ्यांना त्यांच्या वर्गात पाठविण्यात आले.

कार्यक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

# FDA च्या धाकाने मुरुडमध्ये पानपट्ट्यांना कुलूप; गुटखा-सुगंधित सुपारी विक्री अचानक ठप्प

**दैनिक युवक आधार**

**लातूर ग्रामीण मोहम्मद पिंजारी** : मुरुड शहरात अन्न व औषध प्रशासन (FDA) यांच्या संभाव्य कारवाईची चर्चा सुरू होताच गुटखा व सुगंधित सुपारी विक्रेत्यांमध्ये मोठी खळबळ उडाली. शहरातील अनेक पानपट्ट्यांनी दुकाने बंद ठेवत गुटखा आणि सुगंधित सुपारीची विक्री तातडीने थांबवल्याचे चित्र सोमवारी पाहायला मिळाले.

विशेष म्हणजे, पोलीस यंत्रणेच्या उपस्थितीत सुरळीत सुरू असलेला व्यवसाय FDA च्या संभाव्य धाडीच्या चर्चेनंतर मात्र क्षणार्धात बंद झाल्याचे चित्र मुरुडकरांनी अनुभवले. त्यामुळे शहरात विविध चर्चांना उधाण आले असून अनेक व्यापाऱ्यांनी दुकानांमधील संबंधित माल




हटवून सावध भूमिका घेतल्याचेही दिसून आले.

शहरातील प्रमुख चौक, बाजारपेठ आणि गर्दीच्या भागांतील अनेक पानपट्ट्या दिवसभर बंद असल्याने नागरिकांचे लक्ष या घडामोडीकडे वेधले गेले. काही ठिकाणी तर नेहमीची ग्राहकांची वर्दळ असलेल्या पानपट्ट्यांवर पूर्ण शुकशुकाट पाहायला मिळाला.

FDA कडून बंदी असलेल्या तंबाखूजन्य पदार्थांवर सातत्याने कठोर कारवाई केली जात असल्याने व्यापाऱ्यांमध्ये या विभागाबाबत विशेष धास्ती असल्याची चर्चा आहे. त्यामुळे संभाव्य तपासणीची केवळ चाहूल लागताच अनेकांनी व्यवसाय तात्पुरता बंद ठेवणे पसंत केल्याचे बोलले जात आहे.

दरम्यान, "ज्या पानपट्ट्या अन्यवेळी सुरळीत सुरू असतात, त्या FDA च्या नावानेच बंद का होतात?" असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे. या घडामोडींमुळे मुरुडमध्ये FDA च्या कारवाईच्या धाकाची पुन्हा एकदा चर्चा रंगली असून, संबंधित विभागाच्या नावानेच व्यापाऱ्यांमध्ये धावपळ उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे.

# 1.82 कोटींचे पोर्टेबल टॉयलेट कुठे आहेत? पनवेलकरांचा थेट सवाल; कागदावर टॉयलेट आणि मैदानात शून्य?

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी : दिपक कोळवणकर** : पनवेल महानगरपालिकेने पोर्टेबल टॉयलेटसाठी तब्बल 1 कोटी 82 लाख रुपयांचे कंत्राट दिल्याची माहिती समोर आली आहे. मात्र या खर्चाच्या तुलनेत शहरात प्रत्यक्ष किती पोर्टेबल टॉयलेट उभारण्यात आली आहेत, ती नेमकी कुठे आहेत आणि नागरिकांना त्याचा कितपत लाभ होत आहे, याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे.

शहरातील अनेक भागांत सार्वजनिक स्वच्छतागृहांची कमतरता असताना इतका मोठा निधी खर्च झाल्यानंतरही पोर्टेबल टॉयलेट सहज नजरेस पडत नसल्याची चर्चा नागरिकांमध्ये सुरू आहे. काही ठिकाणी एखादे-दुसरे पोर्टेबल टॉयलेट दिसून येत असले तरी 1.82 कोटी रुपयांच्या खर्चाच्या तुलनेत त्यांची संख्या आणि उपलब्धता याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत.नागरिकांचा सवाल आहे की, या कंत्राटाअंतर्गत एकूण किती पोर्टेबल टॉयलेट बसविण्यात आली? ती कोणत्या ठिकाणी उभारण्यात आली आहेत? त्यांची देखभाल आणि स्वच्छता कोण करत आहे? तसेच यासाठी खर्च झालेल्या निधीचा तपशील सार्वजनिक करण्यात येणार का?

पनवेल महानगरपालिकेने संबंधित कामाचा संपूर्ण तपशील, टॉयलेटची ठिकाणनिहाय यादी, खर्चाचा तपशील आणि सद्यस्थिती नागरिकांसमोर जाहीर करावी, अशी मागणी होत आहे. कारण सार्वजनिक निधीतून खर्च होणाऱ्या प्रत्येक रुपयाचा हिशोब नागरिकांना मिळणे हा त्यांचा अधिकार आहे.

"1.82 कोटी रुपयांचा खर्च झाला असेल तर त्या बदल्यात नागरिकांना सुविधा कुठे मिळत आहेत?" हा प्रश्न आता सर्वसामान्य पनवेलकर विचारत आहेत. पोर्टेबल टॉयलेट प्रत्यक्षात किती कार्यरत आहेत आणि किती केवळ कागदोपत्री आहेत, याचा खुलासा प्रशासनाने करणे गरजेचे असल्याचे मत नागरिक व्यक्त करत आहेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून वस्तुस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणीही जोर धरत आहे. कारण जर सुविधा प्रत्यक्ष उपलब्ध नसतील, तर हा विषय केवळ खर्चाचा नसून सार्वजनिक निधीच्या पारदर्शकतेचा आणि उत्तरदायित्वाचा देखील आहे.

# निराधार महिलेसाठी वैश्विक विकास संस्थेची धाव

## घरासाठी दिली टिनपत्रांची मदत

**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी)** : शेंबाळपिंपरी येथील अपघातग्रस्त व निराधार महिला धूरपताबाई भोसले यांना निवाऱ्याचा आधार मिळावा यासाठी वैश्विक विकास संस्थेच्या वतीने घरासाठी टिनपत्रांची मदत करण्यात आली. या उपक्रमातून संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत माणुसकीचा हात पुढे केला आहे.धूरपताबाई भोसले यांचा काही दिवसांपूर्वी अपघात झाला होता. त्या निराधार असल्याने त्यांच्या निवाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला होता. ही बाब पोलिस पाटील प्रतिनिधी बापुराव कांबळे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी



पुढाकार घेत वैश्विक विकास संस्थेशी संपर्क साधला.

परिस्थितीची माहिती मिळताच संस्थेने तात्काळ दखल घेत धूरपताबाई यांच्या घरासाठी आवश्यक टिनपत्रे उपलब्ध करून दिली. शनिवारी मान्यवरांच्या उपस्थितीत ही मदत लाभार्थींपर्यंत पोहोचविण्यात आली.यावेळी सरपंच रविंद्र महल्ले, मतीन पहिलवान, सुरेश वाकडे, सुनील वाहुळे, किशोर तळणकर यांच्यासह गावातील अनेक प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

या मदतीबद्दल धूरपताबाई भोसले यांनी वैश्विक विकास संस्था तसेच बापुराव कांबळे यांचे मनःपूर्वक आभार मानले. या सामाजिक उपक्रमामुळे एका गरजू महिलेला आधार मिळाला असून गावकऱ्यांकडून संस्थेच्या कार्याचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

# सीबीडी बेलापूरमध्ये आढळलेल्या अनोळखी मृत व्यक्तीची ओळख पटविण्याचे पोलिसांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**नवी मुंबई प्रतिनिधी** : सीबीडी बेलापूर परिसरात बेशुद्ध अवस्थेत आढळून आलेल्या एका अनोळखी व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. संबंधित व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नसून सीबीडी पोलीस ठाण्याने नागरिकांना ओळख पटविण्यासाठी मदतीचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १४ मे २०२६ रोजी पहाटे सुमारे ४ वाजण्याच्या सुमारास सेक्टर-६ येथील साई सावली उद्यान परिसरात एक अनोळखी पुरुष बेशुद्ध अवस्थेत आढळून आला. त्याला तत्काळ एमजीएम रुग्णालय, बेलापूर येथे उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र डॉक्टरांनी सायंकाळी ६.१८ वाजता त्याला मृत घोषित केले. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ४५ ते ४८ वर्षे असून उंची सुमारे ५.५ फूट आहे. अंगाने मध्यम बांधा, सावळा वर्ण आणि उभट चेहरा अशी त्याची ओळख आहे. मृत व्यक्तीने राखाडी रंगाची जिन्स पँट तसेच काळ्या रंगाचा शर्ट परिधान केला होता. शर्टवर पांढऱ्या रंगाच्या फुलांची नक्षी आहे. या संदर्भात सीबीडी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू नोंद (अ.मृ. रजि. क्र. ०८/२०२६) दाखल करण्यात आली आहे. संबंधित व्यक्तीची ओळख किंवा त्याच्या नातेवाईकांबाबत माहिती असलेल्या नागरिकांनी सीबीडी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

# महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात येईपर्यंत आमचा लढा सुरुच राहील - केंद्रीयराज्यमंत्री रामदास आठवले

**दैनिक युवक आधार**
**मुकुंद कांबळे प्रतिनिधी** : बुद्धगया येथील महाबोधी महाविहार हे बौध्दांचे जागतिक श्रध्दास्थान आहे. महाबोधी महाविहार हा आमच्या धम्माचा हक्क आहे. महाबोधी महाविहारचे सर्व ट्रस्टी हे बौध्दच असले पाहिजे, महाबोधी महाविहारचे चेअरमन ही बौध्दच असले पाहिजे. जोपर्यंत महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात येत नाही तोपर्यंत महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा लढा आमचा सुरुच राहील असा निर्धार रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी आज व्यक्त केला. लखनौ येथे महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला समर्थन देण्यासाठी आयोजित धम्म महोत्सव मध्ये प्रमुख पाहुणे म्हणून ना. रामदास आठवले बोलत होते. यावेळी पूज्य भंते विनाचार्य; भंते अर्यवंश; भंते अनुकृती;भंते अनिरूद्ध; रिपब्लिकन पक्षाचे उत्तर प्रदेश अध्यक्ष पवन गुप्ता आदी अनेक मान्यवर उपस्थित होते.

लखनऊ येथे महाबोधी महाविहार आंदोलनातील सर्व भिख्खु संघाची सभा आयोजित करण्यात आली होती. महाबोधी महाविहार मुख्य आंदोलनाचे प्रमुख पुज्य भंते विनाचार्य यांच्या नेतृत्वात यावेळी भिख्खु संघाची बैठक घेण्यात आली होती. त्यात केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.



महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे, यासाठी सुरु झालेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनात केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी मोठी भुमिका बजावलेली आहे. बुध्दगया, पटणा, महाराष्ट्र, दिल्ली आदि अनेक ठिकाणी ना. रामदास आठवले यांनी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनात सक्रिय सहभाग घेवुन आंदोलनाला पाठिंबा दिलेला आहे. महाबोधी महाविहार बौध्दांच्या ताब्यात द्यावे यासाठी बुध्दगया येथे भेट देवुन त्यांनी पटना येथे बिहारचे राज्यपाल मोहम्मद आरिफ खान आणि बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री नितीश कुमार यांची भेट घेतली होती. तसेच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची भेट घेवून महाबोधी महाविहार



बौध्दांच्या ताब्यात देण्याची मागणी केली होती. महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला सक्रिय सहभाग घेवुन पाठिंबा दिल्यामुळेच केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांना आज लखनऊ येथे महाबोधी महाविहार आंदोलनाच्या बैठकीसाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणुन निमंत्रित केल्याची माहिती यावेळी भंते विनाचार्य यांनी दिली. यावेळी संपूर्ण उत्तरप्रदेशमधील 300 बौध्द भिख्खु उपस्थित होते.

उत्तरप्रदेशात सर्व जिल्हयांमध्ये महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाचा लढा तिव्र करण्याच्या नियोजनासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी पुज्य भंते विनाचार्य यांनी महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन उत्तरप्रदेशात तीव्र करण्याची घोषणा केली.

येत्या 26 ऑगस्टपासुन पुज्यभंते विनाचार्य यांच्या नेतृत्वात भिख्खु संघ संपूर्ण उत्तरप्रदेशात महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनासाठी भव्य यात्रा सुरु करणार आहे. या यात्रेला रिपब्लिकन पक्षाचा पूर्ण पाठिंबा असल्याचे ना. रामदास आठवले यांनी जाहीर केले. उत्तरप्रदेशात सर्व जिल्हयात महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला पुजनीय भिख्खु संघाला रिपब्लिकन पक्षाचे सर्व कार्यकर्ते पूर्ण पाठिंबा देतील अशी ग्वाही ना. रामदास आठवले यांनी यावेळी दिली.

## गॅस पाइपलाइनसाठी रस्ते खोदले; दुरुस्तीबाबत नागरिकांच्या मनात प्रश्नचिन्ह

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** महानगर गॅस लिमिटेडकडून विविध भागांमध्ये गॅस पाइपलाइन टाकण्यासाठी मोठ्या प्रमाणात रस्ते खोदण्यात आले आहेत. मात्र काम पूर्ण झाल्यानंतरही अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था अत्यंत दयनीय असून नागरिकांना वाहतूक करताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

तक्रारदार दिपक कोळवणकर यांनी याबाबत तक्रार निवारण यंत्रणेकडे पाठपुरावा केला असता, पावसाळ्यापूर्वी खडी टाकून रोलिंग करून रस्ते दुरुस्त करण्यात येणार असल्याचे उत्तर देण्यात आले. मात्र ही पद्धत नेमकी कोणत्या

**गॅस पाइपलाइनच्या नावाखाली रस्ते खोदले जातात; मात्र त्यांची योग्य दुरुस्ती वेळेत होत नसल्याने नागरिकांना धूळ, चिखल, वाहतूक कोंडी आणि अपघातांच्या धोक्याला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे प्रशासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्षात दर्जेदार रस्ते दुरुस्तीची कामे तातडीने हाती घ्यावीत, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करत आहेत.**

**— दिपक कोळवणकर**
**तक्रारदार**

तांत्रिक निकषांवर आधारित आहे, असा सवाल कोळवणकर यांनी उपस्थित केला आहे.

केवळ खडी टाकून तात्पुरती मलमपट्टी करण्याऐवजी कायमस्वरूपी डांबरीकरण कधी करण्यात येणार, याबाबत प्रशासनाने स्पष्ट भूमिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तसेच महानगर गॅस लिमिटेडने खोदलेल्या रस्त्यांच्या पुनर्बांधणीची जबाबदारी नेमकी कोणाची, काम पूर्ण करण्याची अंतिम मुदत काय आणि संबंधित जबाबदार अधिकारी कोण, याची माहिती नागरिकांसमोर ठेवावी, असेही त्यांनी म्हटले आहे

## कोच अद्वैत शेंबवणेकरांच्या मार्गदर्शनाखाली सई कारंडे, विहंग पालवे, बतुल साखरवाला आणि अहाना सोमण चमकले

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी :** जळगाव येथे नुकत्याच पार पडलेल्या प्रतिष्ठित 'महाराष्ट्र राज्य बॉक्सिंग स्पर्धा २०२६' मध्ये पनवेलमधील 'एमपीएसए (MPSA) बॉक्सिंग क्लब'च्या खेळाडूंनी आपल्या उत्कृष्ट कौशल्याच्या जोरावर पुन्हा एकदा यशाची मोहोर उमटवली आहे. मुख्य प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांच्या कुशल व खंबीर मार्गदर्शनाखाली उतरलेल्या या चमूने स्पर्धेत घवघवीत यश संपादन करत



विविध पदकांची कमाई केली आहे.या राज्यस्तरीय स्पर्धेत एमपीएसए क्लबच्या सई कारंडे आणि विहंग पालवे यांनी 'सुवर्ण पदक' पटकावले. त्याचप्रमाणे बतुल साखरवाला हिने 'रौप्य पदक' मिळवले, तर अहाना सोमण हिने आपल्या जिद्दीच्या

**राज्यस्तरीय बॉक्सिंग स्पर्धेत पदकांची कमाई**

जोरावर 'कांस्य पदक' जिंकून क्लबच्या शिरपेचात आणखी एक मानाचे पदक जोडले.या सुवर्ण यशासोबतच सई करंडे हिची आगामी राष्ट्रीय बॉक्सिंग स्पर्धेसाठी अधिकृत निवड झाली आहे. या दैदिप्यमान यशामागे प्रशिक्षक अद्वैत शेंबवणेकर यांचे अथांग परिश्रम आणि त्यांनी खेळाडूंकडून करून घेतलेली कसून तयारी कारणीभूत आहे.

## भावेश कोटांगले कवी, गायक ,संगीतकार, राज्यस्तरीय सामाजिक चळवळ पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**भंडारा प्रतिनिधी :** साकोली तालुक्यात वास्तव्यात असलेले भावेश कोटांगले कवी, गायक ,संगीतकार सामाजिक चळवळीचे प्रबोधनकार यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय कर्मचारी , अधिकारी , शाहीर,



कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. भावेश कोटांगले यांना कवी, गायक ,संगीतकार, राज्यस्तरीय सामाजिक




चळवळीचे प्रबोधनकार राज्यस्तरीय पुरस्कार देऊन मान्यवरांचे हस्ते सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .

त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

## कळवा खाडीत बुडणाऱ्या तरुणाचा अग्निशमन दलाकडून बचाव

**ठाणे :** कळवा खाडीत बुडणाऱ्या एका 30 वर्षीय तरुणाचा अग्निशमन दलाच्या दोन जवानाने धाडसी बचाव करून त्याचा जीव वाचवला.याबाबत अग्निशमन अधिकारी संदीप कदम आणि वाहनचालक गणेश गवारी यांचे धाडसी कामगिरी केल्याबद्दल महापौर शर्मिला पिंपळोलकर व महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी त्यांच कौतुक केले आहे.

आज सकाळी 11.30 वाजताच्या सुमारास साकेत रोड परिसरातील खाडीत नौशाद मेहरूम (वय 30) हे पाण्याचा अंदाज न आल्याने बुडू लागले असल्याच्या घटनेची माहिती मिळताच ठाणे नगर पोलीस, आपत्ती आपत्ती व्यवस्थापन



कक्षाचे कर्मचारी, अग्निशमन दलाचे अधिकारी व जवान तसेच वाहतूक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. बचावकार्यासाठी आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे पिकअप वाहन, अग्निशमन दलाचे रेस्क्यू वाहन आणि जीप तैनात करण्यात आली.दरम्यान, अग्निशमन केंद्र अधिकारी संदीप कदम आणि चालक गणेश गवारी यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ खाडीत उडी घेतली. अग्निशमन जवान आणि आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या कर्मचाऱ्यांच्या मदतीने सुमारे १५ मिनिटांच्या अथक प्रयत्नांनंतर नौशाद मेहरूम

**अग्निशमन अधिकारी संदीप कदम आणि वाहनचालक गणेश गवारी यांचे सर्वत्र कौतुक**

यांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. संबंधित व्यक्तीची मानसिक स्थिती व्यवस्थित नसल्याचेही प्राथमिक तपासात निदर्शनास आले आहे. बचाव करण्यात आलेल्या व्यक्तीला पुढील कार्यवाहीसाठी ठाणे नगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. अग्निशमन दलाच्या धाडसी आणि तत्पर कामगिरीमुळे एका व्यक्तीचा जीव वाचल्याने परिसरात समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## आगग्रस्त कुटुंबीयांना रेडक्रॉस तर्फे मदत साहित्याचे वाटप "

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**
**भंडारा -** इंडियन रेड क्रॉस सोसायटी जिल्हा शाखा भंडारा चे सन्माननीय *अध्यक्ष व जिल्हाधिकारी सावंत कुमार,* *सचिव डॉक्टर नितीन तुरसकर* *यांचे निदर्शनानुसार,,,* वरठी,तालुका मोहाडी, जिल्हा, भंडारा येथील आगग्रस्त *श्री. प्रज्वल राजू हरकंडे व श्री. मुकेश गजानन गोखले* यांचे घराला अचानक आग लागल्यामुळे घरातील जीवनावश्यक वस्तू, अन्नधान्य व साहित्य पूर्णतः जळून खाक झाले.

मानवीयतेच्या हेतूने इंडियन रेड क्रॉस सोसायटी जिल्हा शाखा, भंडाराचे वतीने




आगग्रस्त पीडीत कुटुंबीयांना ग्रामपंचायत सरपंच वरठी श्री. चांगदेव रघुते यांचे उपस्थितीत *मदत साहित्य किट चे वाटप*( ब्लॅंकेट, किचन सेट,हायजिन किट, टॉवेल, तिरपाल इत्यादी ) करण्यात आले.

याप्रसंगी रेड क्रॉस चे रक्तरत्न प्रीतमकुमार राजाभोज,कोषाध्यक्ष हेमंत चंदवासकर, ज्येष्ठ महिला सदस्य श्रीमती मीरा भट्ट,डॉक्टर रुद्रसिन भजनकर, राजू खवसकर,रविशंकर साकोरे व अचल मेश्राम इत्यादी हजर होते.

## तारा सुरेश किन्हेकर यांना विदर्भ भूषण कला पुरस्काराने सन्मानित

**दैनिक युवक आधार**
**भंडारा वार्ताहर :** नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील रायपूर येथे वास्तव्यात असलेल्या सौ तारा सुरेश किन्हेकर यांच्या सामाजिक कलागुणांची, दखल घेऊन पहेला येथे सन्मान द्या व सन्मान घ्या या प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस सरचिटणीस संजीव भांबोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील पत्रकार,सामाजिक कार्यकर्ते, प्रबोधनकार, कवी, शासकीय



कर्मचारी , अधिकारी , शाहीर, कलाक्षेत्र व इतर क्षेत्रांमध्ये हे उत्कृष्ट कार्य करतात .परंतु शासन स्तरावर त्यांची दखल घेतली जात नाही म्हणून अशा कार्यकर्त्यांची दखल व्हावी, त्यांच्या कार्याची कदर व्हावी , व त्यांना सन्मान मिळावा , व त्यांच्या कार्याला गती मिळावी या उदात्त हेतूने सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्याचा भव्य पुरस्कार सत्कार सोहळा सम्यक बुद्ध विहार पहेला येथील प्रांगणात आयोजित करण्यात आला होता. तारा कीन्हेकर प्रबोधन कला क्षेत्रात मागील ३० वर्षापासून: अग्रेसर असून त्यांच्या कार्याची पावती म्हणून त्यांना सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ , मानाचा फेटा देऊन मान्यवरांच्या हस्ते




सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी डॉ.खुशाल बोपचे माजी खासदार तथा राष्ट्रीय अध्यक्ष अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघ , दैनिक माझा मराठवाडा तथा ज्ञानपंख न्यूज चॅनलचे चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर ,फिल्म अभिनेता अश्विनकुमार वघाले, फिल्म अभिनेत्री चैताली भस्मे, अशोकराव सोनवणे फुले, शाहू ,आंबेडकर चळवळीतील ज्येष्ठ विचारवंत छत्रपती संभाजी नगर, माजी समाज कल्याण सभापती चंद्रशेखर टेंभुर्ण, ब्लू स्टार्म टीव्ही न्यूज चॅनलचे संपादक पत्रकार संजीव भांबोरे व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, पुष्पगुच्छ , पुष्पगुच्छ ,मानाचा फेटा देऊन सन्मानित करण्यात आले .त्यांच्या या मिळालेल्या राज्यस्तरीय पुरस्काराबद्दल त्यांच्या अनेक च्या त्यांनी त्यांचे अभिनंदन केलेले आहे.

# पेरणीच्या उंबरठ्यावर शेतकऱ्यांचा अंत पाहणारी व्यवस्था!

## खत टंचाई, बियाणे भेसळ आणि कृषी विभागाच्या निष्क्रियतेचा वार्षिक खेळ; 'येरे माझ्या मागल्या'ची शोकांतिका कधी थांबणार?

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** महाराष्ट्रातील शेती आज अनेक संकटांशी झुंज देत आहे. एकीकडे हवामानातील अनिश्चितता, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि वाढते उत्पादन खर्च यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे; तर दुसरीकडे शासन यंत्रणेच्या दुर्लक्षामुळे निर्माण होणाऱ्या कृत्रिम संकटांनी त्याचे जगणे आणखी कठीण बनले आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर राज्यभरातील शेतकऱ्यांसमोर खतांची टंचाई, बियाण्यांची भेसळ, कृत्रिम दरवाढ, साठेबाजी आणि प्रशासनाची निष्क्रियता हे प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत.

विशेष म्हणजे ही परिस्थिती काही नवीन नाही. दरवर्षी पेरणीपूर्वी शासनाकडून खतांचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे दावे केले जातात. कृषी विभागाकडून सर्व तयारी पूर्ण झाल्याचे सांगितले जाते. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्याला खतांच्या दुकानांसमोर तासन्तास रांगा लावाव्या लागतात. अनेकदा शेकडो किलोमीटरचा प्रवास करूनही त्याच्या पदरी निराशाच पडते.

**खत टंचाईमागील वास्तव काय?**

राज्यात खरीप हंगामासाठी दरवर्षी लाखो मेट्रिक टन खतांची आवश्यकता असते. शासनाकडून पुरेसा साठा उपलब्ध असल्याचा दावा केला जातो; परंतु गावपातळीवर डीएपी, युरिया आणि एनपीके यांसारखी महत्त्वाची खते वेळेवर उपलब्ध होत नसल्याचे चित्र दिसते. काही व्यापारी कृत्रिम टंचाई निर्माण करून शेतकऱ्यांना इतर उत्पादने खरेदी करण्यास भाग पाडतात. काही ठिकाणी खतांच्या पोत्यांसोबत सूक्ष्म अन्नद्रव्ये, कीटकनाशके किंवा इतर वस्तू घेण्याची सक्ती केली जाते. परिणामी शेतकऱ्याच्या खिशावर अतिरिक्त आर्थिक भार पडतो.

पेरणीचा कालावधी अत्यंत मर्यादित असतो. योग्य वेळी खत उपलब्ध न झाल्यास पेरणी उशिरा होते आणि त्याचा थेट परिणाम उत्पादनावर होतो. त्यामुळे खत टंचाई हा केवळ पुरवठ्याचा प्रश्न नसून शेतकऱ्याच्या उत्पन्नाशी संबंधित



गंभीर विषय आहे.

**बियाण्यांची भेसळ : शेतकऱ्यांच्या विश्वासावरचा घाला**

शेतकरी जेव्हा बियाणे खरेदी करतो, तेव्हा तो केवळ एक उत्पादन विकत घेत नसतो; तर तो आपल्या संपूर्ण हंगामाचे भविष्य खरेदी करत असतो. मात्र काही भेसळखोर व्यापारी आणि कंपन्या निकृष्ट दर्जाची बियाणे बाजारात आणून शेतकऱ्यांच्या आयुष्याशी खेळ करत आहेत.

उगवण क्षमता कमी असलेली, मुदतबाह्य, चुकीच्या जातीची किंवा बनावट बियाणे विकली जात असल्याच्या तक्रारी दरवर्षी समोर येतात. शेतकरी लाखो रुपये खर्च करून पेरणी करतो; परंतु उगवण न झाल्यास किंवा अपेक्षित उत्पादन न मिळाल्यास त्याला आर्थिक, मानसिक आणि सामाजिक फटका बसतो. अनेकदा पुनर्पेरणीची वेळ येते आणि त्यासाठी पुन्हा कर्ज घ्यावे लागते.

**कृषी विभाग फक्त पेरणीपूर्वीच जागा का होतो?**

दरवर्षी पेरणीपूर्वी कृषी विभागाकडून धाडसत्रे, बैठका, तपासण्या आणि सूचना दिल्या जातात. काही नमुने तपासणीसाठी घेतले जातात. मात्र प्रश्न असा आहे की, या कारवाया वर्षभर सातत्याने का होत नाहीत?

भेसळखोर व्यापाऱ्यांवर कठोर गुन्हे दाखल होतात का? त्यांचे परवाने कायमस्वरूपी रद्द होतात का? साठेबाजांविरुद्ध फौजदारी कारवाई केली जाते का? या प्रश्नांची उत्तरे अनेकदा नकारार्थीच असतात. परिणामी दोषींमध्ये कोणतीही भीती राहत नाही आणि प्रत्येक हंगामात तेच प्रकार पुन्हा सुरू होतात.

शेतकरी फक्त ग्राहक नाही, तो देशाचा अन्नदाता आहे

देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असलेल्या शेतकऱ्याला आजही मूलभूत कृषी निविष्ठांसाठी संघर्ष करावा लागत आहे.

खत, बियाणे आणि औषधांची वेळेवर उपलब्धता हा त्याचा अधिकार आहे. मात्र त्यासाठी आंदोलन करावे लागणे, निवेदने द्यावी लागणे आणि प्रशासनाच्या दारात हेलपाटे मारावे लागणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

शासनाने तातडीने कोणती पावले उचलावीत?

खत व बियाण्यांचा जिल्हानिहाय साठा ऑनलाइन सार्वजनिक करावा.

प्रत्येक तालुक्यात विशेष भरारी पथके स्थापन करावीत.

भेसळखोरांवर कठोर फौजदारी गुन्हे दाखल करावेत.

बनावट बियाण्यांमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्यावी.

खतांच्या कृत्रिम टंचाईस जबाबदार व्यापाऱ्यांचे परवाने रद्द करावेत.

कृषी विभागाची जबाबदारी निश्चित करून अधिकाऱ्यांवर उत्तरदायित्व निश्चित करावे.

निष्कर्ष : घोषणा मोठ्या, पण शेतकरी अजूनही प्रतीक्षेत

देशात शेतकरी सन्मानाच्या मोठमोठ्या घोषणा केल्या जातात. कृषी विकासाचे दावे केले जातात. मात्र प्रत्यक्षात शेतकऱ्याला पेरणीच्या उंबरठ्यावर खतांसाठी रांगेत उभे राहावे लागते, बियाण्यांच्या गुणवत्तेबाबत साशंक राहावे लागते आणि प्रशासनाच्या आश्वासनांवरच अवलंबून राहावे लागते.

जोपर्यंत भेसळखोर, साठेबाज आणि निष्क्रिय यंत्रणांवर कठोर कारवाई होत नाही, तोपर्यंत प्रत्येक खरीप हंगामात शेतकऱ्यांसमोर हेच प्रश्न उभे राहणार आहेत.

मग पुन्हा एकदा शेतकऱ्यांच्या तोंडून तेच शब्द बाहेर पडतील—

"पाऊस बदलतो, सरकारे बदलतात; पण खत टंचाई, बियाणे भेसळ आणि शेतकऱ्यांची फसवणूक मात्र बदलत नाही...

पुन्हा 'येरे माझ्या मागल्या'!"

# नव्या नियमांनी पेट्रोल पंपांवर गोंधळ; शेतकऱ्यांच्या मनात असंख्य प्रश्न

**दैनिक युवक आधार**

**राजेश भडंगे निफाड तालुका प्रतिनिधी** : केंद्र सरकारने पेट्रोल व डिझेल विक्रीबाबत लागू केलेल्या नव्या नियमांमुळे ग्रामीण भागात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले असून, विशेषतः शेतकऱ्यांमध्ये डिझेल उपलब्धतेबाबत विविध चर्चा सुरू आहेत. मात्र शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांना इंधन मिळण्यात कोणतीही अडचण येणार नसल्याचे स्पष्ट करत निफाडचे तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन केले आहे.

केंद्र सरकारने ११ जून २०२६ रोजी जारी केलेल्या आदेशानुसार औद्योगिक, व्यावसायिक व संस्थात्मक (बल्क) ग्राहकांना रिटेल पेट्रोल पंपांवरून पेट्रोल व डिझेल खरेदी करण्यास तात्पुरती बंदी घालण्यात आली आहे. तसेच कोणत्याही ग्राहकाला किंवा वाहनाला एका दिवसात २०० लिटरपेक्षा अधिक डिझेल विक्री करता येणार नाही. रिटेल पंपावरून खरेदी केलेल्या डिझेलची पुनर्विक्री करण्यास मनाई करण्यात आली असून, डिझेल केवळ वाहनांच्या टाक्यांमध्ये किंवा पीईएसओ मान्यताप्राप्त कंटेनरमध्येच भरता येणार आहे.

या नव्या नियमांनंतर ग्रामीण भागातील




शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. ट्रॅक्टर, मोटारपंप, जनरेटर व इतर शेतीकामांसाठी अनेक शेतकरी प्लास्टिक ड्रम किंवा कॅनमध्ये डिझेल घेऊन जात असतात. मात्र पीईएसओ मान्यताप्राप्त कंटेनरची अट प्रत्यक्षात कशी लागू होणार, याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना नसल्याने शेतकरी तसेच पेट्रोल पंप चालकांमध्ये प्रश्न निर्माण झाले आहेत.केंद्र सरकारच्या माहितीनुसार काही भागांत औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांकडून मोठ्या प्रमाणात रिटेल पंपांवरून डिझेल खरेदी केली जात होती. त्यामुळे सामान्य ग्राहकांसाठी इंधन उपलब्धतेवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेऊन

### "डिझेलबाबतच्या अफवांना बळी पडू नका; शेतकरी व सर्वसामान्यांना इंधन मिळणारच" – तहसीलदार विशाल नाईकवाडे

**"डिझेलबाबतच्या अफवांना बळी पडू नका. शासनाचा उद्देश सर्वसामान्य ग्राहक आणि शेतकऱ्यांसाठी इंधनाची उपलब्धता कायम ठेवणे हा आहे. इंधनटंचाई निर्माण झालेली नाही. मोठ्या प्रमाणातील खरेदी आणि साठेबाजी रोखण्यासाठीच हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. त्यामुळे शेतकरी व नागरिकांनी कोणतीही भीती बाळगू नये."**

**विशाल नाईकवाडे, तहसीलदार, निफाड**

साठेबाजी, इंधनाचे वळवणे आणि मोठ्या प्रमाणातील खरेदी रोखण्यासाठी हे निर्बंध लागू करण्यात आले आहेत. हे नियम सुरुवातीला तीन महिन्यांसाठी लागू राहणार असून आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल किंवा मुदतवाढ केली जाऊ शकते.

# पहिल्याच बॅचचे दैदिप्यमान यश, ॲड. बी. डी. हंबर्डे विधी महाविद्यालयाचा ९८. ४८ % उल्लेखनीय निकाल

**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :मारुती सत्रे** : आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळ संचलित ॲड. बी. डी. हंबर्डे विधी महाविद्यालय, आष्टी हे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व सक्षम विधी शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्थापन करण्यात आलेले एक महत्त्वाचे शैक्षणिक केंद्र आहे. अल्पावधीतच महाविद्यालयाने शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थीकेंद्री दृष्टीकोन आणि सक्षम मार्गदर्शन याच्या बळावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

महाविद्यालयाचा यंदाच्या विधी (एल.एल.बी.) तीन वर्षी परीक्षेचा निकाल अत्यंत उल्लेखनीय लागला असून एकूण निकाल ९८.४८ टक्के नोंदविण्यात आला आहे. नव्याने स्थापन झालेल्या या महाविद्यालयासाठी हा निकाल अभिमानास्पद ठरला असून पहिल्याच बॅचमध्ये विद्यार्थ्यांनी सादर केलेली गुणवत्ता, सातत्यपूर्ण अभ्यास व जिद्द यामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक वाटचालीस भक्कम व प्रभावी प्रारंभ मिळाला आहे.

या निकालामध्ये गुणवंत विद्यार्थ्यांनी विशेष कामगिरी करत महाविद्यालयाचा नावलौकिक वाढविला आहे. त्यामध्ये गाढवे अरुण चंद्रकांत यांनी प्रथम क्रमांक पटकावून आपली गुणवत्ता अधोरेखित केली आहे. पाटील प्रणित प्रदीप यांनी द्वितीय क्रमांक, तर गाडे अक्षय तुकाराम यांनी तृतीय क्रमांक मिळवून उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या विद्यार्थ्यांच्या यशामागे त्यांचा कठोर परिश्रम, नियोजनबद्ध अभ्यास आणि शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन यांचा मोठा वाटा आहे.

महाविद्यालयात उपलब्ध असलेले अभ्यासपूर्ण वातावरण, विद्यार्थ्यांप्रती असलेली बांधिलकी आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याची तळमळ यामुळे हे यश शक्य झाले आहे. नियमित अध्यापन, मार्गदर्शन सत्रे, तसेच परीक्षाभिमुख तयारी यामुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास लक्षणीयरीत्या वाढल्याचे या निकालातून स्पष्ट होते.

या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या संघमित्रा जावळे, प्रा. फय्युम शेख, प्रा. शेख, प्रा. गर्जे तसेच लिपिक सौ. अश्विनी हंबर्डे यांनी सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशीच प्रगती साधून समाजात जबाबदार, सजग व सक्षम नागरिक म्हणून कार्य करावे, तसेच भारतीय संविधान व राज्यघटनेप्रती निष्ठा राखत आपल्या विधी व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन करावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तसेच संस्थेचे अध्यक्ष मा. किशोर नाना हंबर्डे, उपाध्यक्ष मा. दिलीप शेठ वर्धमाने, कोषाध्यक्ष मा. गणेश पिसाळ व सर्व संचालक मंडळाने विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांच्या पुढील शैक्षणिक व व्यावसायिक वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्याच्या संस्थेच्या ध्येयाला या यशामुळे अधिक बळ प्राप्त झाले आहे.

महाविद्यालय स्थापन झाल्यानंतर विधी (एल.एल.बी.) तीन वर्षी अभ्यासक्रमाची पहिलीच बॅच सन २०२३–२४ मध्ये प्रवेशित झाली होती आणि सन २०२५–२६ मध्ये हीच बॅच यशस्वीपणे बाहेर पडत आहे, ही बाब संस्थेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण व अभिमानास्पद ठरली आहे. अल्पावधीतच मिळवलेले हे यश महाविद्यालयाच्या गुणवत्तेचे द्योतक असून, भविष्यातील यशस्वी वाटचालीसाठी हे पाऊल निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे. शेवटी, सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून त्यांच्या उज्ज्वल, दैदिप्यमान व यशस्वी भवितव्यासाठी हार्दिक शुभेच्छा व्यक्त करण्यात येत आहेत.

# अनुसूचित जातीच्या उपवर्गीकरणाला सेलू तालुक्यातून तीव्र विरोध

**दैनिक युवक आधार**

**सेलू प्रतिनिधी:- महेश राऊत** : महाराष्ट्र शासनामार्फत अनुसूचित जातींमध्ये अ, ब, क, ड असे उपवर्गीकरण करण्याच्या हालचाली सुरू असून त्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या 'अनंत बदर समिती'च्या कार्यपद्धतीबाबत जनतेमध्ये तीव्र नाराजी व असंतोष पसरला आहे. या उपवर्गीकरणाला तीव्र विरोध दर्शवण्यासाठी तालुक्यातील समस्त आंबेडकरी, संविधानप्रेमी नागरिक,सामाजिक संघटना आणि अनुसूचित जातीतील बांधवांच्या वतीने मोर्च्याच्यामाध्यमातून निषेध नोंदवत उपवर्गीकरण रद्द करण्याची मागणी उपजिल्हाधिकारी यांच्यामार्फत राज्याचे मूख्यमंत्री देवेंद्र फडणविस यांच्याकडे सोमवार १५ जून रोजी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या निवेदनात म्हटले आहे की, संविधानाने अनुसूचित जातींना दिलेल्या एकसंध हक्कांमध्ये विभागणी करून समाजात तेढ, संघर्ष आणि परस्पर अविश्वास निर्माण करण्याचा हा प्रयत्न आहे. अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये भांडणे लावून सामाजिक ऐक्याला तडा देण्याचे काम शासनाने करू नये.आरक्षणाचा मूळ हेतू समाजात फूट पाडणे नसून सामाजिक




न्याय प्रस्थापित करणे हा आहे. अशा प्रकारच्या उपवर्गीकरणामुळे सामाजिक सलोखा,बंधुता आणि संविधानाच्या समानतेच्या तत्त्वाला बाधा पोहोचू शकते,अशी भावना निवेदनातून व्यक्त करण्यात आली आहे.या निवेदनाद्वारे अनुसूचित जातीचे आरक्षण अ, ब, क, ड उपवर्गीकरण करण्याचा कोणताही निर्णय तात्काळ मागे घ्यावा, उपवर्गीकरणाच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेली 'अनंत बदर समिती' तात्काळ रद्द करावी,अनुसूचित जातीतील ५९ जातींमध्ये संघर्ष व भेद निर्माण करणारे सर्व प्रयत्न थांबवावेत,संविधानाने अनुसूचित जातींना बहाल केलेल्या हक्कांचे संरक्षण करून सामाजिक ऐक्य अबाधित ठेवावे,जातीय जनगणना करावी,नोकरीतील अनुसूचित जातीचा अनुशेष तात्काळ भरण्यात यावा व खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करावे."या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा अनुसूचित जाती, आंबेडकरी समाज आणि बहुजन समाजामध्ये तीव्र असंतोष निर्माण होऊन राज्यव्यापी लोकशाही मार्गाने आंदोलन उभारले जाईल," असा इशारा 'धडक मोर्चा'चे आयोजक व समस्त आंबेडकरी समाज बांधव,सेलू यांच्या वतीने देण्यात आला आहे. यासाठी अशोक अंभोरे,भिमराज गोटे,राहूल जाधव,प्रदिप धापसे,रोहन आकात,विनोद धापसे,उत्तम लोखंडे,विलास कांबळे,प्रा. के.डी.वाघमारे,सूरेश रणखांबे, सूधीर सावंत,गोविंद साळवे,महेंद्र दूधवडे,ऋतीक सावंत,आनंद साळवे,सिद्धार्थ सिरसाट,अक्षय साळवे,धारूजी धाबे,काशीनाथ वाघमारे,शिवाजी वाघमारे,पांडूरंग वाढवे सह आदींनी पूढाकार घेतला.

# पावसाळ्यापूर्वी प्रभाग ५ मधील नाले व रस्ते स्वच्छ करा नगरसेवक स्वप्नील शिंनगारे यांची उपमुख्याधिकाऱ्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर जिल्हा प्रतिनिधी छत्रपती संभाजीनगर** : सिल्लोड नगरपरिषदेच्या प्रभाग क्रमांक ५ (श्रीकृष्णनगर, टिळकनगर) मधील नाले व रस्ते पावसाळ्यापूर्वी तत्काळ स्वच्छ करावेत, अशी मागणी नगरसेवक स्वप्नील शिंनगारे यांनी केली आहे. या मागणीचे निवेदन त्यांनी सिल्लोड नगरपरिषदेचे उपमुख्याधिकारी असगर पठाण यांना सादर केले आहे.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, पावसाळ्यापूर्वी सदर भागातील नाले व रस्ते स्वच्छ न झाल्यास पाणी साचून नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर होऊ शकतो. हे टाळण्यासाठी नगरपरिषदेने युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम हाती घेऊन त्यासाठी आवश्यक मनुष्यबळ व यंत्रसामग्री उपलब्ध करून द्यावी. यावेळी नगरसेवक स्वप्नील शिंनगारे यांच्यासह योगेश साळवे आणि नारायण पुरी उपस्थित होते.



सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# वेटरला टीप देण्याचा कारणावरून मारहाण

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** वेटरला टीप देण्याच्या कारणावरून बांबूने डोक्यात उपट मारून जखमी केल्याप्रकरणी आरोपी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांच्या विरोधा पनवेल शहर पोलीस ठाण्यात 16 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. प्रथमेश पवार हा सेक्टर 24, कामोठे येथे राहत असून तो त्याच्या मित्रासोबत दारू पिण्यासाठी वेलवेट हॉटेल, कोळखे येथे गेला होता. यावेळी वेटरला टीप देण्याच्या कारणावरून वेटर आणि त्यांच्यामध्ये वाद झाला. यावेळी महेंद्र शेट्टी आणि हॉटेलमधील तीन ते चार वेटर यांनी प्रथमेश याच्या डोक्यात बांबूने उपट मारली आणि लाथाबुक्क्याने मारहाण करून शिवीगाळ केली. यावेळी प्रथमेशच्या गळयातील सोन्याची चैन तुटून नुकसान झाले.

# घरफोडीत लाखोंचे दागिने चोरले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** सांगडे येथील घरात प्रवेश करून चोरांनी चार लाख पाच हजार रुपयांचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. या प्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात 15 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.लक्ष्मण काशिनाथ पाटील हे सांगडे येथे राहत असून त्यांच्या घराचे कुलूप तोडून चोरांनी घरात प्रवेश केला आणि बेडरूममधील लोखंडी कपड्याचे लॉक तोडून दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

# 19 लाख 65 हजारांचे दागिने आणि रोख रकमेची चोरी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून चोरांनी 19 लाख 65 हजार रुपये किमतीचे दागिने आणि रोख रकमेची चोरी केली. याप्रकरणी खांदेश्वर पोलीस अधिक तपास करत आहेत.यातील फिर्यादी या साई शांती भवन, सेक्टर 19, नवीन पनवेल येथे राहत असून त्यांच्या इमारतीमध्ये राहत असलेल्या त्यांचा भाचा यांच्याकडे रात्री झोपण्यास गेले होते. यावेळी चोरांनी त्यांच्या दरवाजाचे कुलूप तोडले आणि बेडरूम मधील 19 लाख 65 हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली.

# नोकरी मिळवून देतो असं सांगून एक कोटी 73 लाख 81 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : नोकरी मिळवून देतो असे सांगून एक लाख 73 लाख 81 हजारांची फसवणूक केल्याप्रकरणी आठ जणांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. 28 मे 2026 ते जून 2026 पर्यंत एव्हॉन शिपिंग कंपनी, लँडमार्क बिल्डिंग, सेक्टर सात, खारघर येथे फिर्यादी पंकज सिंग (वय 23 राहणार कळंबोली) याला शिपिंग कंपनीमध्ये नोकरी लावून देतो असे सांगून कंपनीतील मालक आणि स्टाफ यांनी पंकज आणि इतर 75 मुलाकडून एक कोटी 73 लाख 81 हजार रुपये स्वीकारले आणि नोकरीला न लावता सर्वांची फसवणूक केली. या प्रकरणी अंजली वर्मा, सत्यम वर्मा, अनुज सिंग, बादल रॉय, विकास रॉय, कशिश, रीना, माधुरी यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ट्रिपल तलाक प्रकरणी गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** ट्रिपल तलाक प्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात चौघांविरोधात 15 जून रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. नोव्हेंबर 2025 मध्ये सेक्टर 12, खारघर या ठिकाणी फिर्यादी महिलेला पतीने तीन वेळा तलाक तलाक असे म्हणत ट्रिपल तलाक दिला आणि वडिलांकडून सतत पैसे घेऊन येण्यासाठी दबाव टाकून मानसिक त्रास दिला. यावेळी त्यांच्या सासऱ्याने लज्जास्पद वर्तन करून सासूने पिडितेला शिवीगाळ आणि मारहाण केली. या प्रकरणी पीडित महिलेचे पती, सासू-सासरे मोठे दिर यांच्याविरोधात शारीरिक, मानसिक आणि आर्थिक त्रास दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला.

# जुनी इमारत, नवी उमेद; मोठीजुई आदर्श शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तेचे मान्यवरांकडून शाळेच्या पहिल्याच दिवशी कौतुक







**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी रणिता ठाकूर उरण रायगड :** मोठीजुई जिल्हा परिषद आदर्श शाळेला मान्यवरांची भेट; शैक्षणिक सुविधा, पोषण आहार व डिजिटल

शिक्षणाची पाहणी.संपूर्ण महाराष्ट्रात सोमवार, १५ जून रोजी नवीन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची उत्साहपूर्ण सुरुवात झाली. शाळेची पहिली घंटा वाजताच

राज्यभरातील जिल्हा परिषद व शासकीय शाळांमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. यानिमित्ताने विविध शासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी व सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी शाळांना भेट देऊन शैक्षणिक सुविधांची पाहणी केली.

रायगड जिल्ह्यातील जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, मोठीजुई येथे पंचायत समिती सदस्या कविता रुपेश पाटील, सामाजिक कार्यकर्ते रुपेश पाटील, समग्र शिक्षा अभियानाचे रायगड जिल्हा समन्वयक सचिन पाटील तसेच सामाजिक कार्यकर्त्या व पत्रकार रणिता ठाकूर यांनी भेट देऊन विद्यार्थी, शिक्षक व पालकांशी संवाद साधला.

यावेळी शाळेतील नवागत विद्यार्थ्यांना देण्यात येणारे गणवेश, पाठ्यपुस्तके, पोषण आहार तसेच शाळेतील मूलभूत सुविधांची पाहणी करण्यात आली. आवश्यक सुविधांच्या पूर्ततेसाठी कोणत्या उपाययोजना करता येतील याबाबतही चर्चा झाली.

शाळेची इमारत जुनी असली तरी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी शिक्षकांनी राबविलेले विविध उपक्रम आणि शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी केलेले प्रयत्न पाहून उपस्थित मान्यवरांनी समाधान व्यक्त केले. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी तयार करण्यात आलेली डिजिटल रूम सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

पंचायत समिती सदस्या कविता पाटील यांनी विद्यार्थ्यांना नवीन शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा देत शिक्षकांच्या कार्याचे कौतुक केले. समग्र शिक्षा अभियानाचे जिल्हा समन्वयक सचिन पाटील यांनी रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक गुणवत्तेवर भाष्य केले. सामाजिक कार्यकर्ते रुपेश पाटील यांनी जुन्या इमारतीतही उत्कृष्ट शिक्षण देणाऱ्या शिक्षक व शाळा व्यवस्थापन समितीचे अभिनंदन केले.यावेळी पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्या रणिता ठाकूर यांनी, "ज्या शाळेत शिक्षक आणि पालक यांच्यात सुसंवाद असतो, त्या गावाचा शैक्षणिक दर्जा निश्चितच उंचावतो. मोठीजुई शाळेतील हा समन्वय शाळेचे भविष्य अधिक उज्ज्वल करेल," असे मत व्यक्त केले.

आलेल्या मान्यवरांचे आभार अविनाश नवाळे मुख्याध्यापक आणि शाळेचे शिक्षक वृंद, कौशिक ठाकूर, विश्वनाथ गावंड,अंकुश पाटील,यतीन म्हात्रे,काजल पाटील, आणि शाळा व्यवस्थापन समिती यांनी मानले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी झालेल्या या भेटीमुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी सकारात्मक दिशा मिळाल्याचे चित्र दिसून आले.

# राजासारखे जीवन जगायचे असेल तर शिक्षणच एकमेव पर्याय:ॲड.डॉ. अरुण जाधव

## "जि.प.शाळा तपनेश्वर येथे इयत्ता पहिलीचा प्रवेशोत्सव उत्साहात"




**दैनिक युवक आधार**

**जामखेड प्रतिनिधी बापुसाहेब घोडेस्वार :** समाजात सन्मानाने, स्वाभिमानाने आणि राजासारखे जीवन जगायचे असेल, तर त्यासाठी शिक्षणाशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला शिक्षणाचा अधिकार हा वंचित, उपेक्षित आणि भटक्या-विमुक्त समाजासाठी परिवर्तनाचा मार्ग ठरला आहे.

त्यामुळे सर्वच महापुरुषांनी शिक्षणाला सर्वोच्च स्थान दिले आहे. असे प्रतिपादन अध्यक्षीय भाषणात भटके विमुक्त नेते तथा नगरसेवक ॲड.डॉ.अरुण जाधव यांनी केले.

शहरातील तपनेश्वर परिसरातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा,येथे दि. १५ जून रोजी आयोजित इयत्ता पहिलीच्या प्रवेशोत्सव कार्यक्रमात ते बोलत होते.

पुढे बोलताना ॲड.डॉ. जाधव बोलताना म्हणाले,आज या शाळेत राबविण्यात आलेला प्रवेशोत्सव आणि कुंकवाच्या ताटात पाय बुडवून विद्यार्थ्यांच्या पावलांचे ठसे जतन करण्याचा उपक्रम हा खरोखरच कौतुकास्पद आहे. बालकाच्या शालेय जीवनातील पहिला दिवस आणि शिक्षणाच्या प्रवासातील पहिले पाऊल कायम स्मरणात राहावे, यासाठी शिक्षकांनी केलेला हा अनोखा प्रयत्न अभिनंदनीय आहे.

जिल्हा परिषद शाळेच्या उंबरठ्यावरून बालकाच्या शिक्षण प्रवासाची सुरुवात होते. आज या चिमुकल्यांनी शिक्षणाच्या दिशेने पहिले पाऊल टाकले आहे. हीच मुले उद्याचा समाज घडवतील, याचा विश्वास वाटतो.

प्रवेशोत्सवानिमित्त इयत्ता पहिलीतील विद्यार्थ्यांचे ढोल-ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील पहिल्या दिवसाची आठवण जपण्यासाठी कुंकवाच्या ताटात पाय बुडवून कागदावर पायाचे ठसे घेण्याचा अनोखा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, शैक्षणिक साहित्य, गणवेश तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी आम आदमी पार्टीचे संतोष नवलाखा, नगरसेविका संगीता भालेराव, नगरसेविका नंदा होळकर, माजी नगरसेविका राजश्री पवार, ॲड. शकील शेख, प्रा. संतोष चव्हाण,पत्रकार धनराज पवार, महेंद्र आदे, मच्छिंद्र जाधव, मेघराज पवार यांच्यासह मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे, प्रताप पवार, जयश्री पाटील, मंगल सोलंकर, शितल कदम, रूपाली कांबळे, कल्पना मोरे, स्वाती गोरे आदी पालक व विद्यार्थी उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक मच्छिंद्र खैरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रताप पवार यांनी तर आभारप्रदर्शन शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष धनराज पवार यांनी मानले.

# उपाशी रात्री, अथक संघर्ष आणि अखेर सरकारी नोकरी

## आकाशची यशाच्या आकाशाला गवसणी!




**दैनिक युवक आधार**

**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजू गायकवाड (मोहदरी) :** प्रतिकूल परिस्थिती, आयुष्यभराची वेदना आणि जगण्याचा कठीण संघर्ष यांवर जिद्द, चिकाटी व शिक्षणाच्या बळावर मात करत आकाश विजय कांबळे यांनी यशाचे शिखर गाठले आहे. जलसंपदा विभागात दफ्तर कारकून पदावर त्यांची निवड झाली असून त्यांच्या संघर्षमय जीवनप्रवासाने अनेक युवकांसमोर प्रेरणेचा आदर्श निर्माण केला आहे.

आकाश अवघे पाच वर्षांचे असताना त्यांच्या डोक्यावरून आई-वडिलांचे छत्र हरपले. त्यानंतर आजींनी त्यांचा सांभाळ केला. मात्र अत्यंत हालाखीच्या परिस्थितीमुळे त्यांना बालगृहात दाखल करण्यात आले. काही वर्षांनंतर आजींचेही निधन झाले आणि जगात आपले म्हणावे असे कोणीच उरले नाही.

बालगृहात राहात असताना इतर मुलांना भेटण्यासाठी त्यांचे नातेवाईक येत असत. त्यांच्यासाठी खाऊ, कपडे आणि भेटवस्तू घेऊन येत असत. मात्र आकाश यांना भेटायला कोणीच येत नव्हते. आपलीही कोणीतरी आपुलकीने विचारपूस करावी, अशी इच्छा त्यांच्या मनात अनेकदा दाटून येत असे. पण या वेदनांनी खचून न जाता त्यांनी स्वतःला अधिक सक्षम बनवण्याचा निर्धार केला.

शिक्षणाच्या प्रवासातही संकटांची मालिका सुरूच होती. महाविद्यालयीन शिक्षणाचा खर्च भागवण्यासाठी त्यांनी हॉटेलमध्ये काम केले, मजुरी केली आणि मिळेल ते काम करत शिक्षण सुरू ठेवले. दिवसभर कष्ट आणि रात्री अभ्यास करत त्यांनी बीएसडब्ल्यू व एमएसडब्ल्यू या पदव्या संपादन केल्या.एमएसडब्ल्यूचे शिक्षण घेत असताना विविध प्रात्यक्षिके व शैक्षणिक भेटींसाठी बाहेर जावे लागत असे. त्यामुळे अनेकदा शासकीय वसतिगृहात परतण्यास उशीर होत असे आणि जेवणाची वेळ संपून जात असे. आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्याने बाहेर जेवण घेणेही शक्य नव्हते. काही वेळा केवळ पाच रुपयांचा चिवडा खाऊन त्यांनी दिवस काढले, तर अनेक रात्री उपाशीपोटी झोपावे लागले. मात्र स्वाभिमान आणि शिक्षणावरील विश्वास कायम ठेवत त्यांनी संघर्षाची वाट सोडली नाही.

आज त्याच संघर्षाचे रूपांतर यशात झाले आहे. जलसंपदा विभागातील दफ्तर कारकून पदावर निवड होऊन आकाश यांनी सिद्ध केले आहे की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी जिद्द, मेहनत आणि शिक्षण यांच्या बळावर यश मिळवता येते."संघर्ष हा यशाचा पाया असतो," हे आकाश विजय कांबळे यांनी आपल्या जीवनातून प्रत्यक्ष कृतीतून दाखवून दिले आहे.त्यांच्या या यशाबद्दल परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून विविध स्तरांतून शुभेच्छा दिल्या जात आहेत. त्यांची यशोगाथा आज अनेक युवकांना संकटांशी दोन हात करून स्वप्नांच्या दिशेने वाटचाल करण्याची प्रेरणा देत आहे.

# जागतिक बालकामगार विरोधीदिनानिमित्त जनजागृती




**दैनिक युवक आधार**

**दिलीप कराळे/ अकोला प्रतिनिधी :** जागतिक बालकामगार विरोधी दिनानिमित्त जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा प्रशासनाच्या सहकार्याने जस्ट राईट फॉर चिल्ड्रेन व इंडियन सोशल वेलफेअर सोसायटीच्या संयुक्त विद्यमाने विविध जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या उपस्थितीत बालतस्करी विरोधी मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी लक्ष्मण हगवणे, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये, जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे आदी उपस्थित होते. बसस्थानक, टॉवर चौक, रेल्वे स्टेशन तसेच शहरातील विविध गर्दीच्या ठिकाणी बालकामगार विरोधी दिनाची जनजागृतीसाठी मोहीम रॅली तसेच पथनाट्याच्या माध्यमातून राबविण्यात आली.

या निमित्ताने शहरातील विविध भागांमध्ये बालकामगार प्रथेच्या दुष्परिणामांविषयी नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. विविध पोस्टर्स, बॅनर्स व माहितीपत्रकांच्या माध्यमातून बालहक्क, शिक्षणाचा अधिकार आणि बालकामगार निर्मूलनाबाबत संदेश देण्यात आला.

अकोला जिल्ह्यात इंडियन सोशल वेलफेअर सोसायटी ही स्वयंसेवी संस्था बालविवाह प्रतिबंध, बालकामगार प्रतिबंध व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंध या विषयांवर सातत्याने कार्यरत आहे. संस्था जस्ट राईट्स फॉर चिल्ड्रन या बालहक्कांच्या राष्ट्रीय अलायन्सची भागीदार संस्था असून गोंदिया, अकोला, जालना, भंडारा या जिल्ह्यात विविध बालसंरक्षण उपक्रम राबवत आहे.

जून महिना 'कृती महिना' म्हणून साजरा करण्यात येत असून या कालावधीत जिल्हाभरातील दुकाने, आस्थापना व सार्वजनिक ठिकाणी बालकामगार शोध मोहीम राबवून माहिती संकलित केली जात आहे. संबंधित माहिती सरकारी कामगार अधिकारी कार्यालयाकडे पाठवून जास्तीत जास्त बालकामगारांची सुटका करण्यावर भर दिला जात आहे.

मोहिम यशस्वी होण्यासाठी जिल्हा बाल संरक्षण अधिकारी राजू लाडुलकर, चाईल्ड लाईन समन्वयक हर्षाली गजभिये, जिल्हा प्रकल्प समन्वयक शंकर वाघमारे, समन्वयक पूजा पवार, पूजा मनवर, कम्युनिटी सोशल वर्कर रवींद्र सावरकर, परमानंद मुरमकार, संजीवनी गवई, रेल्वे चाईल्ड लाईन सुप्रवायझर पद्माकर सदानशिव, अपर्णा सहारे, रेल्वे सुरक्षा दलाचे सहायक निरीक्षक रजनीकांत, रेल्वे पोलीस स्टेशन चे हेड कॉन्स्टेबल अशोक चांदूरकर, हर्षा सरदार यांनी सहकार्य केले.

# सुदर्शन विद्यालयाने पाचवीत आलेले विद्यार्थ्यांचे व दहावीत प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे केले स्वागत







**दैनिक युवक आधार**

**बीड आष्टी प्रतिनिधी :- मारुती सत्रे :** उन्हाळ्याच्या मजेदार सुट्ट्या आता संपल्या आहेत. खेळ, फिरणे, आणि नातेवाईकांसोबत घालवलेले आनंदाचे दिवस आठवणीत राहतील. आता पुन्हा शाळेत जाण्याची वेळ आली आहे.

शाळेत आपले मित्र भेटतील, नवीन गोष्टी शिकायला मिळतील, आणि नवीन अनुभव मिळतील. नवीन पुस्तके, नवीन धडे आणि नवीन उद्दिष्टांसह आपण नव्या उत्साहाने शैक्षणिक वर्षाची सुरुवात करूया.चला, आनंदाने आणि आत्मविश्वासाने शाळेत जाऊया. आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण या गावांमधील सुदर्शन विद्यालयाच्या वतीने पाचवी मधील आलेल्या विद्यार्थ्यांचे फुले उधळून करण्यात आले स्वागत. तसेच दहावी मध्ये प्रथम आलेले विद्यार्थी मुस्कान सलीम शेख प्रथम क्रमांक,जगताप ऋतुजा दत्तो द्वितीय क्रमांक,राजपुरे सृष्टी लहू तित्रीय क्रमांक,साई दादासाहेब गवारे चौथा क्रमांक या सर्व विद्यार्थ्यांचे शाल श्रीफळ देऊन सन्मानित करण्यात आले.2003 दहावी बॅच यांच्याकडून शाळेला दहा हजार रुपयांचा साऊंड सिस्टिम शाळेची आठवण म्हणून देण्यात आले यावेळी शाळेचे माजी विद्यार्थी शहादेव गवारे,आदिनाथ भगत,महादेव भोसले, नवनाथ भोसले,बाळासाहेब भगत, शंकर भगत,बंडू खिलारे,गोवर्धन खिलारे,देवदास गवारे,कृष्णा खिलारे, रमेश खिलारे,सुधीर भोसले,उद्धव भोसले,उद्धव खिलारे,अरुण वाघमारे, दीपक भोसले,गणेश राऊत,गोविंद लोखंडे,छत्र गुण जगताप,सातपुते हरीश,श्रीकांत चौधरी,विठ्ठल भोसले, खिलारे ज्ञानेश्वर, या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेला भेट देऊन शाळेतील जुन्या गोष्टींना उजाळा दिला.मुख्याध्यापक बोडखे सर यांनी बोलताना पाचवीच्या नवीन विद्यार्थ्यांचे तसेच दहावीच्या प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचे तसेच 2003 च्या विद्यार्थ्यांचे शब्दसुमनाने स्वागतत करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व शाळेच्या भविष्यासाठी तसेच विद्यार्थ्यांसाठी भवितव्यासाठी शाळेच्या वतीने सर्व ते प्रयत्न केले जातील.यावेळी उपस्थित जगताप ताई, गवारे ताई, राजपुरे ताई,मुख्याध्यापक साईनाथ बोडखे सर,ढोले सर,धोंडे सर, हाके सर,हजारे सर,विष्णू मामा,राऊत राजगुरू मामा,मॅडम खिलारे व मान्यवर ग्रामस्थांच्या वतीने कार्यक्रम मोठ्या उत्सवात पार पडला

# महाराणा प्रताप : राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक



भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, सम्राट आणि योद्धे होऊन गेले. काहींनी आपल्या सामर्थ्याच्या बळावर मोठी साम्राज्ये उभी केली, तर काहींनी प्रशासन, संस्कृती आणि लोककल्याणाच्या माध्यमातून आपले वेगळेपण सिद्ध केले. परंतु केवळ पराक्रमामुळे नव्हे, तर स्वाभिमान, राष्ट्रनिष्ठा, स्वातंत्र्यप्रेम आणि अदम्य जिद्दीमुळे जनमानसात अजरामर ठरलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे महाराणा प्रताप. भारतीय संस्कृतीत मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या वीरांची परंपरा आहे. या परंपरेतील तेजस्वी नाव म्हणून महाराणा प्रताप यांचा उल्लेख केला जातो. मेवाडच्या या महान राजाने कोणत्याही प्रकारच्या परकीय अधिपत्यापुढे झुकण्यास नकार दिला आणि जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत स्वातंत्र्यासाठी संघर्ष केला. त्यामुळेच आजही त्यांचे जीवनचरित्र प्रेरणेचा अखंड झरा मानले जाते.

भारतातील अनेक भागांत तिथीनुसार महाराणा प्रताप यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. यंदा १७ जून रोजी तिथीनुसार महाराणा प्रताप जयंती साजरी होत आहे. हा दिवस केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणाचा नसून स्वाभिमान, त्याग, राष्ट्रभक्ती आणि कर्तव्यनिष्ठा या मूल्यांचे पुनर्स्मरण करण्याचा आहे.

महाराणा प्रताप यांचा जन्म राजस्थानमधील कुंभलगड येथे झाला. त्यांचे वडील महाराणा उदयसिंह द्वितीय हे मेवाडचे शासक होते, तर माता जयवंता बाई यांनी प्रताप यांच्या व्यक्तिमत्त्वावर संस्कारांची समृद्ध छाप उमटविली. बालपणापासूनच प्रताप यांच्यात निर्भयता, शौर्य आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. तलवारबाजी, घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि युद्धकौशल्य यांचे शिक्षण त्यांनी अत्यंत निष्ठेने घेतले. राजपुत्र म्हणून त्यांना राजवैभवाचा अनुभव मिळाला; परंतु पुढील आयुष्यात त्यांनी वनवास, दारिद्र्य आणि संघर्ष यांचाही तितक्याच धैर्याने स्वीकार केला.

सोळाव्या शतकातील भारताच्या राजकीय परिस्थितीकडे पाहिले असता मुघल साम्राज्याचा विस्तार वेगाने होत होता. सम्राट अकबराने विविध राजपूत संस्थानांशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. अनेक राजपूत राजांनी मुघल अधिपत्य स्वीकारले; परंतु मेवाडचे स्वातंत्र्य टिकविण्याचा निर्धार महाराणा प्रताप यांनी केला. मेवाड हा केवळ एक प्रदेश नव्हता, तर तो राजपूत स्वाभिमानाचे प्रतीक होता. त्यामुळे मेवाडच्या सार्वभौमत्वाशी तडजोड करणे प्रताप यांना मान्य नव्हते.

इ.स. १५७२ मध्ये महाराणा प्रताप यांचा मेवाडच्या सिंहासनावर राज्याभिषेक झाला. त्या वेळी मेवाड अनेक संकटांनी वेढलेला होता. चित्तौडगड आधीच मुघलांच्या ताब्यात गेला होता. राज्याची आर्थिक स्थिती कमकुवत होती आणि अनेक भागांवर बाह्य दबाव होता. अशा कठीण परिस्थितीत प्रताप यांनी राज्यकारभाराची धुरा सांभाळली. त्यांनी आपल्या प्रजेचा विश्वास संपादन केला आणि मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी अखंड संघर्ष करण्याचा संकल्प केला.

अकबराने अनेक वेळा दूत पाठवून महाराणा प्रताप यांना मुघल अधिपत्य स्वीकारण्याचा प्रस्ताव दिला. परंतु प्रताप यांनी स्वाभिमानाशी तडजोड करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्यासाठी राज्यापेक्षा स्वातंत्र्य अधिक महत्त्वाचे होते. ते म्हणत असत की परकीय अधीनतेत वैभवशाली जीवन जगण्यापेक्षा स्वातंत्र्यासाठी संघर्ष करताना कष्ट सहन करणे अधिक श्रेष्ठ आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे ते भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासातील अग्रगण्य प्रेरणास्रोत ठरतात.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातील सर्वाधिक प्रसिद्ध घटना म्हणजे हळदीघाटीची लढाई. १५७६ मध्ये मेवाड आणि मुघल सैन्य यांच्यात हळदीघाटी येथे भीषण युद्ध झाले. मुघल सैन्याचे नेतृत्व आमेरचे राजा मानसिंह करत होते, तर महाराणा प्रताप स्वतः आपल्या सैन्याचे नेतृत्व करत होते. संख्येने मुघल सैन्य अधिक बलवान असले, तरी मेवाडच्या सैनिकांनी अद्भुत शौर्याचे दर्शन घडविले. या युद्धात महाराणा प्रताप यांचा प्रिय घोडा चेतक याने दाखविलेली निष्ठा आणि पराक्रम आजही लोककथांचा विषय आहे.

चेतक हा केवळ घोडा नव्हता, तर महाराणांचा विश्वासू सहकारी होता. युद्धादरम्यान गंभीर जखमी होऊनही त्याने महाराणांना सुरक्षित स्थळी पोहोचविले. अखेरीस त्याचा मृत्यू झाला. चेतकाच्या निष्ठेची कथा भारतीय जनमानसात आजही भावनिक आदराने सांगितली जाते. महाराणा प्रताप आणि चेतक यांचे नाते हे माणूस आणि प्राणी यांच्यातील स्नेह, विश्वास आणि समर्पणाचे अद्वितीय उदाहरण मानले जाते.

हळदीघाटीच्या युद्धानंतर महाराणा प्रताप यांचे संघर्षमय जीवन अधिक कठीण बनले. त्यांनी अरवली पर्वतरांगांमध्ये आश्रय घेतला. कुटुंबासह त्यांना अत्यंत प्रतिकूल परिस्थितीचा सामना करावा लागला. दंतकथांनुसार त्यांच्या कुटुंबाला अनेकदा उपासमारीची वेळ आली. जंगलात राहून त्यांनी आपल्या स्वातंत्र्यलढ्याची ज्योत कायम ठेवली. संकटांनी खचून न जाता त्यांनी नव्या जोमाने सैन्य संघटित केले आणि गनिमी काव्याच्या तंत्राचा प्रभावी वापर केला.

महाराणा प्रताप यांच्या संघर्षात भामाशाह यांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. भामाशाह हे महाराणांचे विश्वासू सहकारी होते. त्यांनी आपल्या संपत्तीचा मोठा भाग महाराणा प्रताप यांच्या स्वातंत्र्यलढ्यासाठी अर्पण केला. या आर्थिक मदतीमुळे महाराणांना सैन्याची पुनर्बांधणी करता आली. राष्ट्रहितासाठी संपत्तीचा त्याग करण्याची प्रेरणा भामाशाह यांच्या उदाहरणातून मिळते.

महाराणा प्रताप हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर ते दूरदृष्टी असलेले प्रशासकही होते. त्यांनी आपल्या राज्यातील जनतेच्या कल्याणाला प्राधान्य दिले. प्रजेच्या सुरक्षिततेसाठी त्यांनी विविध उपाययोजना केल्या. शेती, व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देण्याचा प्रयत्न केला. जंगलांमध्ये आणि डोंगराळ भागातही प्रशासन प्रभावीपणे चालविण्याची त्यांची क्षमता उल्लेखनीय होती.

त्यांच्याराज्यकारभारातील एक महत्त्वाचा पैलू म्हणजे सर्वधर्मसमभाव. महाराणा प्रताप यांनी विविध समाजघटकांना आपल्या संघर्षात सहभागी करून घेतले. त्यांच्या सैन्यात विविध जाती-धर्मांतील लोक होते. हकीम खान सूर यांच्यासारख्या मुस्लिम योद्ध्यांनीही मेवाडच्या स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण केले. यावरून महाराणा प्रताप यांची राष्ट्रकल्पना ही धर्मनिरपेक्ष आणि सर्वसमावेशक होती, हे स्पष्ट होते.

महाराणा प्रताप यांच्या जीवनातून आत्मसन्मानाचे महत्त्व अधोरेखित होते. आजच्या भौतिकवादी युगात अनेकदा तत्त्वांशी तडजोड करण्याची प्रवृत्ती दिसून येते. अशा वेळी प्रताप यांचे जीवन आपल्याला मूल्यांशी प्रामाणिक राहण्याची प्रेरणा देते. त्यांनी संकटांना घाबरून माघार घेतली नाही. अपयश आले तरी संघर्ष सोडला नाही. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील ही जिद्द आणि चिकाटी आजच्या तरुण पिढीसाठी विशेष मार्गदर्शक ठरते. इतिहासात अनेकदा युद्धांच्या निकालावरून व्यक्तिमत्त्वांचे मूल्यमापन केले जाते; परंतु महाराणा प्रताप यांच्या बाबतीत तसे घडत नाही. हळदीघाटीच्या युद्धात निर्णायक विजय मिळाला नसला, तरी त्यांनी स्वातंत्र्याचा लढा अखंड सुरू ठेवला. पुढील काळात त्यांनी मेवाडमधील अनेक प्रदेश पुन्हा आपल्या ताब्यात घेतले. चावंड येथे त्यांनी नवी राजधानी स्थापन केली आणि राज्याची पुनर्बांधणी केली. त्यामुळे त्यांच्या जीवनाचे मूल्यमापन केवळ युद्धाच्या निकालावर नव्हे, तर त्यांच्या अटळ संघर्षावर केले पाहिजे.

महाराणा प्रताप यांच्या चरित्राचा प्रभाव साहित्य, लोककला आणि जनमानसावर मोठ्या प्रमाणात पडलेला दिसतो. राजस्थानातील लोकगीतांमध्ये त्यांच्या शौर्याचे वर्णन आढळते. अनेक कवी, लेखक आणि इतिहासकारांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आहे. श्यामनारायण पांडे यांच्या ‘हल्दीघाटी’ या काव्यातून महाराणांच्या पराक्रमाचे प्रभावी चित्रण केले गेले आहे. विविध भाषांमधील साहित्यकृतींनी त्यांच्या स्मृती जिवंत ठेवल्या आहेत.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातही महाराणा प्रताप यांचे उदाहरण प्रेरणादायी मानले गेले. परकीय सत्तेविरुद्ध संघर्ष करणाऱ्या अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेतली. स्वराज्य, स्वाभिमान आणि आत्मनिर्भरतेची भावना जागृत करण्यासाठी त्यांच्या जीवनाचा उल्लेख केला जात असे. राष्ट्रनिर्मितीच्या प्रक्रियेत आदर्श व्यक्तिमत्त्वांची गरज असते आणि महाराणा प्रताप हे त्यापैकी एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे.

आजच्या काळात महाराणा प्रताप जयंती साजरी करताना केवळ मिरवणुका, पुष्पहार आणि औपचारिक कार्यक्रम यांपुरते मर्यादित राहणे योग्य ठरणार नाही. त्यांच्या विचारांचा आणि मूल्यांचा समाजजीवनात अंगीकार होणे आवश्यक आहे. स्वाभिमान म्हणजे अहंकार नव्हे, तर स्वतःच्या अस्तित्वाची जाणीव होय. राष्ट्रभक्ती म्हणजे इतरांविषयी द्वेष नव्हे, तर देशाच्या प्रगतीसाठी सकारात्मक योगदान देण्याची वृत्ती होय. त्याग म्हणजे केवळ भौतिक वस्तूंचा त्याग नव्हे, तर सामूहिक हितासाठी वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवण्याची तयारी होय. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून या मूल्यांचे शिक्षण मिळते.तरुण पिढीसमोर आज अनेक आव्हाने आहेत. स्पर्धात्मक जीवनशैली, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, मूल्यांमधील बदल आणि करिअरची धडपड या सर्वांमध्ये आत्मविश्वास आणि नैतिकतेचे महत्त्व अधिक वाढले आहे. अशा परिस्थितीत महाराणा प्रताप यांचे जीवन युवकांना प्रेरणा देऊ शकते. प्रतिकूल परिस्थितीतही ध्येयाप्रती निष्ठा राखणे, परिश्रम करण्यास तयार राहणे आणि संकटांना सामोरे जाण्याचे धैर्य बाळगणे ही शिकवण त्यांच्या चरित्रातून मिळते.

राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टीनेही महाराणा प्रताप यांचे कार्य महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी विविध समाजघटकांना एकत्र आणून स्वातंत्र्यलढा उभारला. आज विविधतेने नटलेल्या भारताला सामाजिक सलोखा, परस्पर आदर आणि एकात्मतेची गरज आहे. मतभेद असले तरी राष्ट्रीय हित सर्वोच्च मानण्याची वृत्ती समाजात रुजली पाहिजे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून ही प्रेरणा मिळते.

इतिहासाचा अभ्यास करताना व्यक्तिपूजेला बळी पडणे योग्य नाही; परंतु महान व्यक्तिमत्त्वांकडून प्रेरणा घेणे आवश्यक आहे. इतिहास हा केवळ भूतकाळाचा लेखाजोखा नसून वर्तमानाला दिशा देणारा आणि भविष्य घडविणारा मार्गदर्शक असतो. महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला शिकवते की परिस्थिती कितीही कठीण असली, तरी धैर्य, आत्मविश्वास आणि मूल्यनिष्ठा यांच्या बळावर संकटांवर मात करता येते.

महाराणा प्रताप यांचे निधन १५९७ मध्ये झाले. मृत्यूपूर्वीही त्यांनी मेवाडच्या स्वातंत्र्याची चिंता व्यक्त केली होती, असे सांगितले जाते. आपल्या अखेरच्या श्वासापर्यंत त्यांनी मातृभूमीप्रती निष्ठा कायम ठेवली. त्यांच्या पश्चातही त्यांच्या संघर्षाची परंपरा जिवंत राहिली. आज अनेक स्मारके, पुतळे आणि ऐतिहासिक स्थळे त्यांच्या स्मृती जागवितात; परंतु त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्यांच्या विचारांचे स्मरण समाजाच्या चेतनेत कायम राहणे आवश्यक आहे.महाराणा प्रताप जयंती हा केवळ एका राजाचा जन्मदिन नाही, तर तो भारतीय स्वाभिमानाचा उत्सव आहे. या दिवशी आपण त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी पैलूंचे स्मरण करून स्वतःला अधिक जबाबदार नागरिक बनविण्याचा संकल्प केला पाहिजे. प्रामाणिकपणा, कर्तव्यनिष्ठा, धैर्य, स्वातंत्र्यप्रेम आणि राष्ट्रसेवा ही मूल्ये आपल्या आचरणात उतरली, तरच महाराणा प्रताप यांना खरी आदरांजली वाहिली जाईल.

आज भारत प्रगतीच्या नव्या वाटेवर वाटचाल करीत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण आणि अर्थव्यवस्था या क्षेत्रांत देशाने उल्लेखनीय प्रगती केली आहे. तथापि, या प्रगतीला नैतिक मूल्यांची जोड असणे आवश्यक आहे. विकासासोबतच चारित्र्यनिर्मितीही महत्त्वाची आहे. महाराणा प्रताप यांच्या जीवनातून मिळणारी प्रेरणा या दृष्टीने अत्यंत उपयुक्त आहे. त्यांनी दाखवून दिले की भौतिक यशापेक्षा तत्त्वनिष्ठा अधिक मौल्यवान असते.

महाराणा प्रताप यांचे चरित्र हे भारतीय संस्कृतीतील तेजस्वी अध्याय आहे. त्यांचा संघर्ष, त्याग आणि स्वाभिमान यांची गाथा पिढ्यान्पिढ्या प्रेरणा देत राहील. त्यांच्या जयंतीनिमित्त आपण त्यांच्या कार्याचे स्मरण करून राष्ट्रहिताला प्राधान्य देण्याचा, सामाजिक ऐक्य जपण्याचा आणि मूल्याधिष्ठित जीवन जगण्याचा निर्धार करूया. कारण इतिहासातील महान व्यक्तिमत्त्वांचे स्मरण तेव्हाच सार्थ ठरते, जेव्हा त्यांच्या आदर्शांचे प्रतिबिंब आपल्या कृतीत दिसून येते.

महाराणा प्रताप यांचे जीवन आपल्याला एक महत्त्वाचा संदेश देते की परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, संसाधने कितीही मर्यादित असली, तरी ध्येय स्पष्ट असेल आणि त्यासाठी अखंड प्रयत्न करण्याची तयारी असेल, तर अशक्य वाटणारी उद्दिष्टेही साध्य करता येतात. स्वाभिमानाची ज्योत तेवत ठेवणारा हा महान योद्धा भारतीय जनमानसात सदैव अजरामर राहील. त्यांच्या स्मृतीला विनम्र अभिवादन करीत, तिथीनुसार साजऱ्या होणाऱ्या महाराणा प्रताप जयंतीनिमित्त सर्वांना प्रेरणा, ऊर्जा आणि राष्ट्रसेवेची नवी दिशा लाभो, हीच कृतज्ञ भावना व्यक्त करावीशी वाटते.


**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# शताब्दीच्या उंबरठ्यावरचा प्रश्न : संघाने पारदर्शकतेची परीक्षा द्यावीच

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षाच्या उंबरठ्यावर कर्नाटकचे गृहमंत्री प्रियांक खर्गे यांनी संघप्रमुख मोहन भागवत यांना लिहिलेले पत्र केवळ एका राजकीय वादाचा विषय नाही तर ते भारतीय लोकशाहीसमोरील एका मूलभूत प्रश्नाला स्पर्श करणारे आहे. हा प्रश्न आहे समाज आणि राजकारणावर व्यापक प्रभाव असलेल्या संस्थांनी स्वतःला सार्वजनिक उत्तरदायित्वाच्या चौकटीत उभे करावे की नाही? संघाचे समर्थक सांगतात की संघ ही नोंदणीकृत संस्था नसून “व्यक्तींचा समूह” आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या या संघटनेला नंतरच्या कोणत्याही कायद्याने नोंदणी करण्यास भाग पाडले नाही. न्यायालये आणि आयकर विभागानेही वेळोवेळी या स्थितीची दखल घेतली आहे. कायदेशीरदृष्ट्या हा युक्तिवाद ग्राह्य धरला जाऊ शकतो. परंतु प्रश्न केवळ कायदेशीरतेचा नाही; तो लोकशाही मूल्यांचा आणि सार्वजनिक विश्वासाचा आहे. देशभरात लाखो स्वयंसेवक, हजारो शाखा, शेकडो मार्गसंचलने आणि लाखोंचा सहभाग असलेले कार्यक्रम राबविणारी संघटना सार्वजनिक जीवनात इतकी प्रभावशाली असेल, तर तिच्या आर्थिक स्रोतांविषयी, मालमत्तेविषयी, निर्णयप्रक्रियेविषयी आणि संघटनात्मक संरचनेविषयी नागरिकांना माहिती मिळणे ही



अवास्तव अपेक्षा ठरू शकत नाही. आज एखाद्या छोट्याशा स्वयंसेवी संस्थेलाही वार्षिक अहवाल, लेखापरीक्षण, देणगीदारांची माहिती आणि करसंबंधी तपशील सादर करावे लागतात. धार्मिक ट्रस्ट, शैक्षणिक संस्था, कंपन्या आणि ग्रामस्तरीय संस्थांनाही विविध प्रकारच्या पारदर्शकतेच्या निकषांचे पालन करावे लागते. मग देशातील सर्वांत मोठी स्वयंसेवी संघटना म्हणून दावा करणाऱ्या संघाला या प्रश्नांपासून अलिप्त का ठेवावे? याचा अर्थ संघावर संशय घ्यावा, असा नाही. उलट, संघाने स्वखुशीने आपल्या आर्थिक आणि प्रशासकीय व्यवस्थेची माहिती सार्वजनिक केली, तर त्याची विश्वासार्हता अधिक दृढ होईल. प्रभाव जितका मोठा, तितकी उत्तरदायित्वाची अपेक्षा अधिक असते, हे लोकशाहीचे मूलभूत तत्त्व आहे.या वादात राजकारणही आहेच. संघ आणि भाजप यांच्यातील वैचारिक संबंध लक्षात घेतले, तर विरोधी पक्षांकडून उपस्थित होणाऱ्या प्रश्नांकडे पूर्णपणे निरपेक्ष दृष्टीने पाहिले जाईल, अशी अपेक्षा करणे अवघड आहे. मात्र संघावर होणारी प्रत्येक टीका ही केवळ राजकीय प्रेरणेनेच होत असते, असे मानणेही वास्तवाशी विसंगत ठरेल. खरे तर हा प्रश्न केवळ संघापुरता मर्यादित नाही. समाजावर प्रभाव टाकणाऱ्या सर्वच धार्मिक, सामाजिक, वैचारिक आणि राजकीय संस्थांसाठी समान पारदर्शकतेचे निकष असणे आवश्यक आहे. नियम सर्वांसाठी समान असतील, तरच त्यांना नैतिक अधिष्ठान प्राप्त होते. लोकशाहीत प्रभावाबरोबर उत्तरदायित्व आणि अधिकाराबरोबर पारदर्शकताही अपेक्षित असते.संघाने आपल्या शताब्दी वर्षाकडे केवळ उत्सव म्हणून नव्हे, तर आत्मपरीक्षणाची संधी म्हणून पाहण्याची गरज आहे. शंभर वर्षांची परंपरा, लाखो कार्यकर्त्यांचे योगदान आणि व्यापक सामाजिक कार्य यांचा अभिमान बाळगत असतानाच सार्वजनिक उत्तरदायित्वाची नवी पायरी चढण्याचे धैर्यही दाखवावे लागेल. लोकशाहीत प्रतिष्ठा ही केवळ इतिहासातून मिळत नाही तर ती पारदर्शकतेतून, विश्वासातून आणि उत्तरदायित्वातून सातत्याने कमवावी लागते. संघासमोर आज नेमकी हिच कसोटी उभी आहे. शताब्दीच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या संघाने या प्रश्नांना टाळण्याऐवजी त्यांना सामोरे जाण्याचा मार्ग स्वीकारला, तर तो केवळ संघाचाच नव्हे तर भारतीय लोकशाहीच्या परिपक्वतेचाही विजय ठरेल.



प्रवीण बागड़े